# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १५ जुलै, २०१५ / आषाढ २४, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८९**

---

**सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील शासकीय अध्यापक विद्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१) * २१७६२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील शासकीय अध्यापक विद्यालयाची इमारत १०० वर्षापूर्वीची असून इमारत दुरुस्त न केल्याने मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २ ते ३ वर्षापासून शासनाकडे लोकप्रतिनिधींमार्फत इमारत दुरुस्ती करणेबाबत मागणी करण्यात येवूनही उक्त इमारत दुरुस्तीसाठी आवश्यक मंजूरी व निधी उपलब्ध करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यालयाच्या इमारतीच्या त्वरीत दुरुस्तीकरिता आवश्यक मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) खरे आहे.

(३) व (४) शासकीय अद्यापक विद्यालयाबाबतचे अंदाज पत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. त्यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर इमारत दुरुस्ती प्रस्तावाबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यात निर्माण झालेल्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(२) * १६६९० श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १९९८ गावे व २३५८ तांडे तीव्र पाणी टंचाईने त्रस्त असून पाणीपुरवठा विभागाकडे सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असताना तब्बल ३ हजार ७६४ नळपाणीपुरवठा योजना बंद पडल्या असल्याचे व उक्त टंचाईग्रस्त गावांमध्ये २३५८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दक्षिण भाग हा कायम दुष्काळी भाग असून सदर भागासाठी मागणी करुनही पाणीपुरवठ्यासाठी पुरेशा टँकरची व्यवस्था न केल्यामुळे तेथील रहिवाशांना तीव्र पाणी टंचाई भासू लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मराठवाड्यातील सुमारे ९७१ गावे व ४३८ वाड्यांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असून राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत सर्वाधिक १५७७ टँकर मराठवाड्यात सुरु असून येत्या काही दिवसांत टँकरची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात लातूरसह शासनाच्या विविध पाणी पुरवठा योजना निधी अभावी बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर गावे व वाड्यांतील पाणी टंचाई कायमस्वरूपी निवारण्यासाठी तसेच बंद पडलेल्या विविध पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) दिनांक २५.५.२०१५ रोजी राज्यामध्ये एकूण १९९८ गावे व २६०७ वाडयांना २३५८ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता.

सद्यस्थितीत राज्यामध्ये एकूण २४९६ इतक्या पाणी पुरवठा योजना विविध कारणास्तव बंद आहेत.

(२) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दक्षिण भाग हा कायम दुष्काळी भाग आहे हे खरे आहे. तथापि, भागात तीव्र पाणी टंचाई नसल्याने टँकरची मागणी नाही.

(३) औरंगाबाद विभागात दिनांक १८.५.२०१५ रोजी एकूण ११९५ गावे, ४३८ वाडया/तांडे येथे एकूण १५७७ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु होता.

यावर्षी सर्वाधिक दि. ८.६.२०१५ रोजीच्या अहवालानुसार औरंगाबाद विभागात एकूण १८६० इतक्या टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु होता.

सद्यस्थितीत औरंगाबाद विभागात दिनांक ६.७.२०१५ रोजी ६४८ गावे, ३९१ वाडयामध्ये ८६३ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) बंद पडलेल्या विविध पाणी पुरवठा योजना निधी अभावी बंद आहेत हे खरे नाही.

(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

टंचाईग्रस्त गावे/वाडयांची तसेच बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजना संदर्भात गावांची पाणी टंचाई कायमस्वरुपी निवारण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्राप्त निधीतून उपाययोजना करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदीचे पाणी रसायनांमुळे दूषित झाल्याबाबत**

**(३) * १८९९५ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरातील पिंटो पार्क इंडस्ट्रियल इस्टेट, तीन नंबर ओटी, उल्हासनगर-३ येथून ते उल्हास नदीच्या पात्रापर्यंत अनधिकृत बांधकाम करुन, अनधिकृत वीज, पाणी व इतर सुविधा वापरुन सुरु असलेल्या रासायनिक व्यवसायातून दूषित रसायने उल्हास नदीत सोडली जातात, हे खरे आहे काय,

(२) तसेच उल्हास नदीमध्ये सांडपाणी व प्रदुषित पाणी सोडले जात असल्याने त्वचाविकारासारखे आजार पसरत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सांडपाणी अथवा प्रदुषित पाणी सोडणा-या कंपन्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) दि.२/७/२०१५ जिल्हा शल्यचिकित्सक उल्हासनगर ३ यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(३) सदरील परिसरातून अस्तित्वात असलेल्या छोटया स्वरुपातील उद्योगांनी कुठल्याही प्रकारची संमती प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतलेली नसल्याने अशा प्रकारच्या अनधिकृत उद्योगांवर कारवाई करण्याचे आदेश म.प्र.नि. मंडळाने MSEDCL व मा. आयुक्त म.न.पा. उल्हासनगर यांना दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुंबई व नागपूरसह १८ शहरांमधील हवा मापदंडाहून अधिक प्रदूषित असल्याबाबत**

**(४) * १६५७५ श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई आणि नागपूरसह १८ शहरांमधील वायुप्रदुषण मापदंडापेक्षा अधिक असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या पहाणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्रीय पर्यावरण विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यातील औद्योगिक विभागातील औरंगाबाद, नवी मुंबई, डोंबिवली आणि चंद्रपूर या चार शहरांनी प्रदुषणाची धोकादायक पातळी ओलांडल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबई शहरामध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक (ए.सी.आई) यंत्रणा संपूर्णत: कार्यरत नसल्याने हवेच्या प्रदुषणाबाबतच्या अद्ययावत नोंदी नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील हवेचे प्रदुषण मोजणाऱ्या किती यंत्रणा कार्यरत आहेत आणि केंद्र शासनाच्या 'सफर' योजनेतून किती हवा प्रदुषण मोजणारी यंत्रे मिळणार आहेत, सदर यंत्रणाची देखभाल व  नविन मिळणारी यंत्रणा केव्हापर्यंत संपूर्णतः कार्यरत होणार आहे याबाबतची अद्ययावत माहिती घेण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, सदर शहरांमधील वायूप्रदुषण मापदंडापेक्षा अधिक असण्याची कारणे काय आहेत व प्रदुषण कमी करण्याबाबत सदर शहरांना कृती आराखडा देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त शहरातील प्रदुषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.रामदास कदम :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर पाहणी नुसार प्रश्नात उल्लेख केलेल्यांपैकी केवळ डोंबिवली व चंद्रपूर या दोन शहरांमधील RSPM चे प्रमाण विहित मानकांपेक्षा अधिक असल्याचे आढळले.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई शहरामध्ये शीव व वांद्रे या दोन ठिकाणच्या परिसरातील हवेच्या गुणवत्तेचे संनियंत्रण करीत आहे. "सफर" योजनेतून ९ हवा प्रदूषण मोजणारी यंत्रे मिळणार आहेत. या संदर्भात प्रदूषण कमी करणेबाबत कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. महाराष्ट्रात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारलेली आहे व त्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे अटी व शर्ती युक्त संमतीपत्र देण्यात आले आहे तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांव्दारे उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन अटी व शर्तीचे अनुपालनबाबत तपासणी करण्यात येत असते. अनुपालनामध्ये त्रुटी आढळून आल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे रीतसर कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जांभुळवाडी (ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर) येथील पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(५) * २३२०४ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जांभुळवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील जिल्हापरिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत सुरु  असलेल्या पाणी योजनेत रु. २८ लाखांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहिरीच्या १० फूट खड्डयासाठी १५ लाख रुपये खर्च, पाणी नसलेल्या विहिरीतील पाणी उपसासाठी २ लाख रुपये, कॉपर डॅमसाठी जागा नसतानाही ८ लाख रुपये अशा नोंदी दाखवून रक्कम उचलण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

(३) होय, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशीमध्ये योजनेच्या कामाचे नोंदविण्यात आलेले मूल्यांकन व प्रत्यक्ष कामाचे मोजमाप घेऊन केलेले मूल्यांकन यामध्ये तफावत असल्याचे आढळून आले. योजनेच्या कामाचे मूल्यांकन करणारे संबंधित कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचेविरुध्द खातनिहाय चौकशीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, सचिव, सदस्य व संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील टेंभापुरी मध्यम प्रकल्पातील पाणी आटल्याने निर्माण झालेली पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(६) * १८०५१ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभापुरी मध्यम प्रकल्पातील पाणी आटल्याने निर्माण झालेल्या पाणी टंचाईमुळे गंगापूर (जि.औरगांबाद) तालुक्यातील लिंबेजळगाव, जिकठाण, गुरुधानोरा, तुर्काबाद, खराडीसह परिसरातील ग्रामस्थांना खाजगी टँकरवाल्यांकडून प्रति हंडा रु.३० या दराने पाणी विकत घ्यावे लागते, हे खरे आहे काय,

(२) तसेच औरंगाबाद जिल्हयात दुष्काळाची भीषणता मोठ्या प्रमाणात जाणवत असून जिल्हा प्रशासनाकडून अंदाजे पाच कोटी रूपयांचा अपव्यय होऊनही टंचाईग्रस्त तालुक्यातील नागरिकांना पाणी मिळत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील गावांतील पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागावा यासाठी राज्य शासनामार्फत भारत निर्माण योजना, आपलं पाणी व जलस्वराज्य आदी योजनांतून पाणी देण्याबाबत व प्रश्न भाग (२) मधील टंचाईग्रस्त नागरिकांना प्रति माणसी १५ लिटर पाणी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर** : (१) टेंभापुरी प्रकल्पातील पाणी आटल्याने गंगापुर तालुक्यातील लिंबेजळगाव, जिकठाण, गुरुधानोरा, तुर्काबादखराडी (ता, गंगापुर) या गावात पाणी टंचाई निर्माण झाली हे खरे आहे. तथापि, प्रशासनाने विविध उपाययोजना राबवून पाणीपुरवठा केल्यामुळे ग्रामस्थांना खाजगी टँकरव्दारे रुपये ३०/- प्रति हंडा या दराने पाणी विकत घ्यावे लागले नाही.

(२) हे खरे नाही.

पाणी टंचाई निवारणासाठी १०२४ गावे व ६२ वाडयात २४५८ उपाययोजनांचा रुपये ४५५२.८७ लक्ष रुपयांचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या टंचाई कालावधीत विविध उपाययोजनांद्वारे टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(३) लिंबेजळगाव, जिकठाण व गुरुधानोरा या गावांमध्ये भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

तसेच, तुर्काबाद, खराडी या गावांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत योजना पूर्ण करण्यात आली आहे.

तसेच, या टंचाई कालावधीत विहीर अधिग्रहण व टँकरद्वारे पाणीटंचाई धोरणानुसार २० लीटर दरडोई दर दिवशी पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील मुळा-मुठा, इंद्रायणी व पवना नद्यांचे झालेले प्रदुषण

**(७) * १८१५७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश गोरे**

**(खेड आळंदी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पिंपरी-चिंचवड, दौंड, हडपसर या शहरातील कारखान्यांच्या दुषित पाण्यामुळे मुळा-मुठा नदी प्रदुषित झाली असून हेच पाणी पुढे उजनी नदीत मिसळत असल्याने उजनी जलाशयातील पाणी प्रदुषित होऊन त्याचे दुरगामी परिणाम सर्वसामान्य नागरीक, शेती, पिके, गुरे यांच्यावर होत असल्याची बाब प्रदुषण नियंत्रण मंडळाने अहवालाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास वेळोवेळी आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चिखली (जि.पुणे) येथील इंद्रायणी नदीच्या पात्रात औद्योगिक कंपन्या रसायनयुक्त प्रदूषित पाणी सोडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे व दुषित पाण्यामुळे मोठया प्रमाणात रोगराई पसरल्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून दोन व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पिंपरी चिंचवड येथील सांडपाणी विनाप्रक्रिया पवना नदीमध्ये मिसळल्यामुळे नदीचे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त नद्यांचे प्रदुषण रोखण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधून काहीअंशी तसेच इतर मोठ्या लोकसंख्येच्या गावामधून विना पक्रिया घरगुती सांडपाणी नदी मध्ये सोडले जाते त्यामुळे उजनी येथील पाणी दुषीत झाले असल्याचे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर फौजदारी खटला (आर.सी.सी. नं.१४४/२०००) मा.मुख्य दंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केला आहे व तो अद्यापी न्याय प्रविष्ठ आहे. म.प्र.नि. मंडळाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दि. ३/६/२०१५ रोजी मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा पुर्ण क्षमतेने चालविण्याच्या अटी व शर्ती सह, बँक

हमी घेऊन संमतीपत्र दिले आहे, तसेच मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा पुर्ण क्षमतेने शास्त्रोक्त पध्दतीने चालविण्याकरिता दि.१९/०६/२०१५ रोजी आदेशही पारित केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(८) * १६९४० श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :**

**तारांकित प्रश्न क्रमांक ७१०० ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदी जलपर्णीने पूर्ण भरली असून, शहरातील रोज २० टँकर सेप्टीक टॅकमिल मैला व गाळ जुन्या एसटीपीत टाकण्यात येत असल्यामुळे व हातकणंगले, कागल पंचतारांकित (जि.कोल्हापूर) औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांचे हजारो लिटर रसायनयुक्त सांडपाणी तळंदगे, तळंदगे फाटा, इंगळी या गावांमधून नाल्याद्वारे थेट पंचगंगा नदीत मिसळत असल्यामुळे व नदीपात्र परिसरातील कारखान्यांमुळे पाण्याचे प्रदुषण होवून अनेक ठिकाणी मासे मृत्युमुखी पडल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उच्च न्यायालयाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाला निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कायमस्वरुपी उपाय योजनांसाठीचा रुपये १०८ कोटी ९३ लाखांचा प्रकल्प अहवाल राज्य शासनाने केंद्र शासनाकडे निधीसाठी पाठवून पाच महिने झाले तरी केंद्राचा निधी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नदीतून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने व नदीच्या पाण्याला रसायनयुक्त उग्रवास येत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने केंद्राकडून निधी उपलब्ध होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर नदी पात्र प्रदुषित करणाऱ्या कंपन्यांवर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) कारखान्याचे सांडपाणी काही प्रमाणात पंचगंगा नदीत मिसळले हे अंशत: खरे आहे.

तथापि, माहे मे, २०१५ मध्ये औद्योगिक वसाहती मधील रासायनिक सांडपाणी मिसळून पंचगंगा नदीत अनेक ठिकाणी मासे मृत्यूमुखी पडले हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) पंचगंगा नदीचे सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय नदी कृती योजने अंतर्गत केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयास दि.२४.११.२०१४ रोजी पाठविला होता. तथापि केंद्र शासनाने त्यांच्या दि.२३.१.२०१५ च्या पत्राद्वारे काही त्रुटीची पुर्तता करण्याबाबत कळविले असून सद्य:स्थितीत शहरी भागातील प्रकल्पाना प्राथम्य क्रम असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे. केंद्र शासनाने कळविलेल्या त्रुटींची पुर्तता जिल्हापरिषद कोल्हापूर यांच्या स्तरावर करण्यात येत आहे. याबाबत पुर्तता करण्यासाठी शासनाने जिल्हापरिषद यांना दि. १६.३.२०१५ च्या पत्राद्वारे पुन्हा कळविले आहे.

(४) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रदुषणास कारणीभुत असलेल्या उद्योग घटकांवर कायदेशीर कारवाई केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबत

**(९) * २०१३० श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अल्पसंख्यांक मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत इ. १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सन २०१२-१३, २०१३-१४ व सन २०१४-१५ पर्यंतची रक्कम शासनाकडून दिली गेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ३ वर्षाची शिष्यवृत्ती न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणतः केव्हापर्यंत उक्त कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) सन २०१२-१३ पासून सदर शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या बँक खातेविषयक परिपूर्ण माहितीअभावी विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्ती जमा करण्यास विलंब होतो.

(३) याप्रकरणी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ च्या याद्या अद्यावत करुन पुढील कामकाज करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच सन २०१४-१५ मधील नवीन व नुतनीकरणाच्या केंद्र शासनाने मंजूर केलेल्या याद्या उपलब्ध असून नवीन व नुतनीकरणाच्या विद्यार्थ्यांची बँक खात्याची माहिती ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. बँक खात्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर ईसीएस द्वारे जमा करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील शाळांमध्ये शिक्षणासाठी पायाभुत सुविधा पुरविण्याबाबत**

**(१०) * २००३५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक शाळेने विकास आराखडा तयार करणे बंधनकारक असतानाही राज्यातील ८८ हजार २९४ शासकीय अनुदानित शाळांपैकी १४.६४ टक्के म्हणजेच १२ हजार ९७० शाळांनी त्यांचे विकास आराखडे तयार केलेले नसून राज्यातील ३५ हजार

शाळांमध्ये प्रसाधनगृहांची सोय असली तरीही त्यामध्ये पाण्याची सोय नाही त्यापैकी सांगली जिल्ह्यातील ४२० शाळेतील स्वच्छतागृहात पाणी नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात ७५० शाळांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहे नसतानाही शासनाचा शेकडो कोटीचा निधी मात्र शिल्लक राहिला असून १४११ अनुदानित शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांना स्वच्छतागृहांसारखी मुलभूत सुविधा मिळत नसून आर.टी.ई., २००५ अन्वये जिल्हा परिषद व नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी स्वच्छतागृह पुर्ण केल्याचा अहवाल देऊनही स्वच्छतागृह पूर्ण न केलेल्या शाळा माहे, मे,२०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील १२ हजार शाळांमध्ये अद्याप वीज नाही, मात्र यातील १ हजार ८०० शाळांमध्ये वीज नसतानाही संगणकाची हायटेक व्यवस्था करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार याबाबत दोषींवर कोणती कारवाई केली तसेच उक्त शाळांना स्वच्छतागृह उपलब्ध करण्यासह सर्व मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

शासकीय व अनुदानित एकूण ८९,०९१ शाळांपैकी ७९,६०९ म्हणजेच ८९.३५ टक्के शाळांनी विकास आराखडा बनवला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) याबाबत चौकशी करुन निदेश देण्यात येतील.

-----------------

**जळगांव जिल्ह्यातील १६३ गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(११) * २१५३७ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील १६३ गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार पाणी टंचाई असलेल्या गावात पाणी टंचाई निवारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्हयात सद्य:स्थितीत ११२ गावांना पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

(२) व (३) होय.

गावांची टंचाई सदृश्य स्थितीनुसार व पाहणीनुसार पाणी टंचाई निवारणार्थ खाजगी विहीर अधिग्रहण (३१), टँकरने पाणी पुरवठा करणे (६) व नवीन विंधन विहीर/कूपनलिका घेणे (११४) अशा एकूण १५२ उपाययोजना पाणी टंचाई असलेल्या गावांत घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयात प्रदुषणामुळे श्वसन व चर्मरोग रुग्णांच्या संख्येत झालेली वाढ

**(१२) * २२१६६ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात प्रदुषणामुळे गत पाच वर्षात श्वसनासंबंधीचे विविध विकारांमुळे ४२० जणांचा मृत्यु झाला असून श्वसन व चर्मरोग रुग्णांची संख्या सव्वा लाखांवर असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर जिल्हयातील प्रदुषण कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना आखण्यात आली व त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त उपाययोजनेतून कोणते परिणाम निदर्शनास आले आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) जिल्हा शल्क चिकित्सक, जिल्हा चंद्रपूर यांच्या अद्यावत अहवालानुसार चंद्रपूर जिल्हयात मागील ५ वर्षात प्रदुषणामुळे एकही मृत्यू झालेला नाही. तथापि, श्वसनाच्या व चर्मरोग रुग्णांच्या संख्येबाबतची माहिती खरी आहे.

(२) व (३)

विविध आजारांनी बाधित झालेल्या रुग्णांसाठी जिल्हयातच आरोग्य यंत्रणा कार्यरत असून जिल्हयातील प्रदुषणाचे नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची यंत्रणा आवश्यक त्या सर्व उपाय योजना करीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोहगांव हाडे (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील नळपाणी पुरवठा योजनेत झालेला अपहार**

**(१३) * १७२७४ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोहगांव हाडे (ता. रिसोड,जि.वाशिम) येथील रूपये ४१.६४ लाखांच्या ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनेस भारत निर्माण योजनेअंतर्गत सन २००७ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही सदर नळ पाणीपुरवठा योजनेतून गांवक-यांना पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपूर्ण नळ योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व अपहार झाल्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत गोहगांव हाडे यांनी वांरवार वरिष्ठ अधिकारी यांचेकडे तक्रारी दिल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणीपुरवठा नियमित सुरु करण्याकरिता व अपहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. सदर नळ योजना ग्रामपंचायतीच्या देखभाल व दुरुस्ती अभावी बंद आहे.

(३) होय.

(४) सदर योजनेतून पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत व गट विकास अधिकारी यांना सुचित केले आहे. तसेच योजनेतील झालेल्या अपहाराबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात पिण्याच्या पाण्याचे जलस्त्रोत दुषित आढळून आल्याबाबत

**(१४) * २४५८३ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री. राजू तोडसाम (आर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात ६७४ ग्राम पंचायतीमध्ये पिण्याच्या पाण्याचे जलस्त्रोत दुषित आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयात २ हजार २४० गावे असून ते १२०७ ग्राम पंचायतीअंतर्गत येतात, ग्रामीण भागात नळ योजना, विहीर, हातपंप आदिव्दारे दुषित पेयजल पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या पाहणीत ६७४ ग्राम पंचायतीतील पेयजलाचा जलस्त्रोत दूषित असल्याचे आढळून आल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांनी ग्राम पंचायतीच्या सरपंच व सचिव यांना याबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने ग्रामीण भागात शुध्द पेयजल पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) यवतमाळ जिल्हयात १८४१ गावे असून २२९५ वाड्यावस्त्या आहेत. त्यापैकी, ६७८ गावात पिण्याच्या पाण्याचे जलस्त्रोत दुषित आढळून आले. सदर गावांमध्ये पर्यायी स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे जलस्त्रोतांचे नियमीत निर्जतुकीकरण करुन शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

जलस्त्रोत दुषित असल्याचे आढळून आल्यामुळे गट विकास अधिकारी तसेच ग्रामपंचायत सचिव यांना नियमित निर्जंतुकीकरण करुन शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याच्या मौखिक सूचना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी दिल्या आहेत.

(४) दुषित आढळून आलेल्या जलस्त्रोतांची माहिती देण्याकरीता गावांमध्ये विशेष ग्रामसभा घेवुन शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या सूचना संबंधित ग्रामपंचायतींना देण्यात आल्यात. तसेच या पुढे नियमीत शुध्द पाणी पुरवठा करण्यास सर्व संबंधित वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व गटविकास अधिकारी यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातून वाहणा-या हिरण्यकेशी नदीचे झालेले प्रदुषण

**(१५) * १८४९४ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातून वाहणा-या हिरण्यकेशी नदीत संकेश्वर येथील हिरण्यकेशी कारखान्यातून मळीमिश्रित पाणी मिसळत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गडहिंग्लज शहरातील सांडपाणी हिरण्यकेशी नदीमध्ये सोडले जात असल्याने गडहिंग्लजच्या पूर्व भागातील २० ते २५ गावातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत प्रांताधिकारी, गडहिंग्लज यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच तेथील नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार हिरण्यकेशी नदीचे पाणी दूषित होऊ नये तसेच उक्त कारखान्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार माहे एप्रिल, २०१५ या कालावधीत गडहिंग्लज पूर्व भागातील गावामध्ये कोणत्याही प्रकारच्या साथींचा प्रार्दुभाव झालेला नाही.

(३) प्रांतधिकारी, गडहिंग्लज यांनी त्याच्याकडे प्राप्त तक्रार उचित कारवाई साठी नगरपरिषद व तहसिलदार यांच्याकडे पाठविली होती.

(४) तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाने दि.२२/११/२०१४ व दि.२५/६/२०१५ रोजी भेट देवून हिरण्यकेशी नदी काठावरील नागनूर (महाराष्ट्र) व संकेश्वर (कर्नाटक) येथे भेट देवून नदी व नाल्यांचे पाण्याचे नमुने घेतले. त्यानुसार दि.७/४/२०१५ व दि.१/६/२०१५ रोजी नगरपालिकेस मंडळाद्वारे समज पत्र देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयातील डायलिसिस यंत्रणा नादुरुस्त झाल्याने रुग्णांची होणारी गैरसोय**

**(१६) * २१८५८ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयामधील अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुध्द अनेक तक्रारी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या असून सदरील रुग्णालयातील डायलेसिस यंत्रणा नादुरुस्त झाल्यामुळे रुग्णांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या अखेरीस व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त रुग्णालयात राजीव गांधी योजनेंतर्गत डायलेसिसच्या उपचारास मान्यता असतानाही एकही रुग्णाला त्याचा लाभ मिळत नसल्याने गरीब रुग्णांना प्रतिडायलेसिसकरीता २००/- रुपये विनाकारण खर्च करावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने प्रश्न भाग (१) बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रश्न भाग (२) बाबत संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोहा (जि.नांदेड) तालुक्यात पाणीटंचाई निवारणार्थ कामात झालेला अपहार**

**(१७) * १७११६ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यात कोरडा दुष्काळ पडल्याने निर्माण झालेली पाणीटंचाई निवारणार्थ शासनाने सहा कोटी निधी मंजूर केला आहे. परंतु पाणीपुरवठा विभाग प्रमुखाच्या कारभारामध्ये अनागोंदी सुरू असून सुमारे २०० गाव, वाडी, तांडे असताना केवळ २३ टँकरद्वारे अनियमित पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी पाणी टंचाई निवारणार्थ कामात अपहार करणाऱ्या पाणीपुरवठा विभागाच्या प्रमुखाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

लोहा तालुक्यात पाणी टंचाई असून या उन्हाळयात तालुक्यात ५५ टँकर द्वारे ३९ गावे व २७ वाडयांना पाणीपुरवठा सुरु आहे.

तसेच, १०६ खाजगी विंधन विहीरी /विहीरी अधिग्रहीत करुन ६५ गावे व ३८ वाडी तांडयांना पाणीपुरवठा करण्यात आला आहे. नळ योजना विशेष दुरुस्ती करुन ३ गावांना व तात्पुरती पुरक नळ योजनेद्वारे ४ गावांना पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच, ९५ विंधन विहीरी विशेष दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

नांदेड जिल्हयात पाणी टंचाई २०१५ निवारणार्थ रुपये १५१८.४९ लक्ष खर्च झाला आहे.

(२) टंचाई निवारणार्थ कामात कोणताही अपहार झालेला नाही. त्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील पाणीटंचाईबाबत**

**(१८) * १६९११ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री. शिरीषदादा**

**चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील १६ गावातील ३३ वाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून तेथील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच डेरवण, तळसर, अनारी व कुडप (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावांतील धनगरवाड्यासाठी शासनाने पाणी पुरवठा योजना राबविली होती परंतू निकृष्ट दर्जाच्या कामामुळे सदर योजना बंद पडल्याने चारही गावांतील नागरिकांना पाण्यासाठी ४ किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे व जनावरांनाही पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात आली वा येत आहे तसेच प्रश्न भाग (२) मधील निकृष्ट दर्जाच्या कामास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

मे २०१५ अखेरीस रत्नागिरी जिल्हयांत एकूण टंचाईग्रस्त ८४ गावे १८६ वाडयांना त्यांच्या मागणीनुसार टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर पाणीपुरवठा योजना अन्य कारणाने बंद पडली होती. योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याने योजना बंद पडली नव्हती.

या गावांतील ग्रामस्थांची मागणी नसल्याने सन २०१५ च्या उन्हाळयात टँकरने पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही. पंप सुरु नसताना सदर वाडयांतील ग्रामस्थांनी पाणी पुरवठयासाठी गावांतील अन्य स्त्रोतांचा वापर केला आहे.

(३) व (४) डेरवण, तळसर, अनारी व कुडप, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी या गावातील धनगरवाडयासाठी राबविलेली योजना कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना आहे.

सदर योजनेतील त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने या योजनेचा उद्‌भव म्हणून सार्वजनिक विहीर प्रस्तावित केली असून ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

योजना निकृष्ठ दर्जाची झाली नसल्याने संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यात शासकीय कार्यालये-संस्थांकडून मराठी भाषा**
**पंधरवडा साजरा करण्यात आला नसल्याबाबत**

**(१९) * १७५५३ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने लाखो रुपये खर्च करुन गेट वे ऑफ इंडिया येथे मराठी भाषेचा गौरव कार्यक्रम केला परंतू प्रत्यक्षात मात्र मराठी संवर्धनाकडे दुर्लक्ष केले जात असल्याने शासनाने दिनांक १ ते १५ मे, २०१५ या कालावधीत राज्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबतचा शासन निर्णय जारी केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदा महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने उक्त कालावधीत सुरु झालेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात शासन निर्णयानुसार संबंधित शासकीय कार्यालये तसेच व्यापारी-खाजगी बँकानी हा मराठी संवर्धन पंधरवडा साजरा करण्याचे सूचित करुन त्याबाबत केलेल्या कार्यक्रमांचा अहवाल माहे जून, २०१५ पर्यंत देण्याचेही स्पष्ट करण्यात आले असतानाही संबंधितांकडून या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

सन २०१४ करिता भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा "ज्ञानपीठ" पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक प्रा.भालचंद्र नेमाडे यांना प्रदान करण्यात आला. ज्ञानपीठ विजेत्यांचा गौरव हा मराठी भाषेचा गौरव असल्यामुळे शासनाच्या वतीने प्रा.नेमाडे यांचा गौरव करण्यासाठी तसेच यापूर्वीचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते यांचे स्मरण करण्यासाठी ज्ञानपीठ गौरव सोहळा हा कार्यक्रम दि. ७.५.२०१५ रोजी गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित केला होता.

सन २०13 पासून दि. १ ते १५ मे या कालावधीत प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यात येतो. प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीदेखील मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत सर्व शासकिय, निमशासकिय कार्यालयांना शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या होत्या.

मराठी भाषा विभाग व त्याअंतर्गत सर्व कार्यालयांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

(२) नाही.

दि. १ ते १५ मे या कालावधीत मराठी भाषेशी संबंधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत प्रतिवर्षी सूचना देण्यात येतात. चालू वर्षीदेखील भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत शासनामार्फत सर्व संबंधितांना आवाहन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती जाणून घेण्याकरिता याबाबतचा अहवाल शासनाने मागविला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासनाने पालघरसह राज्यातील मॉडेल इंग्रजी स्कूल**
**बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२०) * २१३५७ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४३ तर पालघर जिल्ह्यातील ५ तालुक्यात केंद्र शासनाच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियानांअंतर्गत सन २०१२ पासून सुरू करण्यात आलेल्या मॉडेल इंग्रजी स्कूल या शाळांना देण्यात येणारा निधी केंद्र शासनाने बंद केल्याने राज्य शासनाने सदरील शाळा बंद करण्याचा निर्णय माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निर्णयामुळे पालघर जिल्ह्यातील ५ मॉडेल स्कूल बंद होणार असल्याने त्यातील ४०० विद्यार्थ्यांचा भविष्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बंद करण्यात आलेल्या शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना इतरत्र सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) अशंतः खरे आहे. तालुक्यातील गट शिक्षणधिकारी यांनी जव्हार, मोखाडा, डहाणू, विक्रमगड व तलासरी या तालुक्यातील मे, २०१५ मध्ये बंद झालेल्या मॉडेल स्कूल मधील आदिवासी विद्यार्थ्यांना इतरत्र सामावून घेण्यात आले आहे. प्रवेशापासून आदिवासी विद्यार्थी वंचित नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयात औषधे व सोयीसुविधांअभावी रुग्णांची होणारी गैरसोय

**(२१) * २१९१६ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयात रुग्णांची तपासणी व उपचार योग्य पद्धतीने होत नसून औषधांचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात असल्याबाबतच्या अनेक तक्रारी हॉस्पीटल प्रशासनास सामाजिक संघटना व नागरिकांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत. तसेच ससून रुग्णालयात श्री.गायकवाड यांच्या पायाच्या मोडलेल्या हाडावर उपचार केले असता त्यांना काहीही झाले नसल्याचा अहवाल ससून रुग्णालयाने दिला मात्र श्री.गायकवाड यांनी खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असता पायाचे हाड मोडले असल्याचे प्राप्त अहवालात निष्पन्न झाल्याने त्यांनी त्याबाबत ससून रुग्णालय प्रशासनाकडे तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच ससून रुग्णालयातील सोनोग्राफी मशीनचे सील काढण्याचे आदेश आरोग्य विभागाच्या मा. राज्यमंत्री यांनी देऊन महिना झाला तरी सदरील मशीन अद्याप सुरु करण्यात आले नसल्याने रुग्णालयात रुग्णांची सोनोग्राफी टेस्ट व डायलिसिस करण्यासाठी रुग्णांना ३ ते ४ तास ताटकळत रांगेत उभे रहावे लागते, रुग्णालयात व्हीलचेअर्स व कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून रुग्णालय प्रशासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे रुग्णालयातील येणाऱ्या रुग्णांचीही गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच उक्त प्रकरणी दोषी असणा-या संबंधित अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील डोळयांच्या सोनोग्राफीचे मशिन PC PNDT कायद्यानुसार मान्यता प्राप्त नसल्याने, महानगरपालिका पुणे यांनी दि.२३/३/२०१५ रोजी सदर मशीन सील केले आहे. दि.१२/६/२०१५ रोजी मा.अध्यक्ष PC PNDT समिती, आरोग्य विभाग मुंबई यांच्या खंडपीठासमोर सदर बाबत सुनावणी झाली असून या सुनावणीचा निर्णय प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सोनोग्राफी मशीन सील केल्याच्या दिनांकापासून रुग्णांना डोळयांच्या सोनोग्राफीसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. रुग्णालयाच्या प्रत्येक कक्षामध्ये व्हीलचेअर्स उपलब्ध आहेत, तसेच वर्ग ४ च्या ८३८ मंजूर पदांपैकी ६२४ पदे भरलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील जे.जे.मगदुम ट्रस्ट विद्यार्थ्यांना नर्सिंग कौन्सीलकडे नोंदणीकरिता आवश्यक असलेल्या रजिस्टर फॉर्मवर संस्थेचा सही शिक्का देत नसल्याबाबत

**(२२) * १९६७५ श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील जे.जे.मगदुम ट्रस्ट, जयसिंगपूर या संस्थेकडे सन २०११/१२ या शैक्षणिक वर्षामध्ये नर्सिंग कोर्ससाठी प्रवेश घेतलेल्या व सन २०१४/१५ या शैक्षणिक वर्षामध्ये कोर्स पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नर्सिंग कौन्सीलकडे नोंदणी करणे बंधनकारक असताना सदर संस्था नर्सिंग कौन्सीलकडे नोंदणीकरिता आवश्यक असलेल्या रजिस्टर फॉर्मवर संस्थेची सही व शिक्का देत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे दि.२ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग एज्युकेशनमध्ये अचानक फी वाढ करुन विद्यार्थ्यांची अडवणूक केल्याच्या निषेधार्थ ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनने दिनांक २७ एप्रिल, २०१५ पासून बेमुदत धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधित इन्स्टिटयुटवर शासनाने कोणती कारवाई केली, तसेच सदरील इन्स्टीटयुट मध्ये वाढलेली फी कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) सदर बाब निवेदनात नमूद केलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकरण जयसिंगपूर येथील सिव्हिल जज्ज डिव्हिजन यांचे कोर्टात न्यायप्रविष्ट आहे.

----------------

## राज्यात बनावट मिनरल वॉटरची विक्री होत असल्याबाबत

**(२३) * १८४५३ श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे जिल्हयात अनेक बनावट कंपन्या कुठलीही परवानगी न घेता बाटली बंद पाण्याचे उत्पादन करीत आहे,हे खरे आहे काय ,

(२) तसेच खेड व शिरुर (जि.पुणे) तालुक्यामध्ये विना परवाना व बीआयएस परवान्याशिवाय पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे उत्पादन करणा-या तसेच वाळुंज इंडस्ट्री, पाबळ येथील ॲक्वा फ्रेश, सुजय ॲक्वा बोर बाभुळवाडी, मायक्रो ॲक्वा वाडा रोड या विना परवाना बीआयएस प्रमाणपत्राशिवाय पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे विक्री करणाऱ्या व्यवसायिकांची अन्न औषध प्रशासनाने तपासणी करुन दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास त्यांच्यावर कार्यवाही केली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मोहोळ (जि.सोलापूर) शहरात मिनरल वॉटर म्हणून साधे पाणी थंड करून जास्त दराने विक्री होत असल्याबाबत व मुंबई येथील रेल्वेस्थानक आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये बनावट व कमी शुध्दतेच्या पाण्याच्या बाटल्यांची सर्रास विक्री होत असल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आणि कोल्हापूर जिल्हयातील मिनरल वॉटर प्रकल्पांवर अन्न व औषधे प्रशासनाने टाकलेल्या छाप्यामध्ये पाण्याचे नमुने पिण्यायोग्य नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त चारही कंपन्यांचे प्रकल्प बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत काय तसेच प्रश्न भाग (३) मधील बनावट व कमी शुध्दतेच्या पाण्याच्या बाटल्या जास्त दराने विक्री करणाऱ्यांवर व कोल्हापूर येथील मिनरल वॉटर प्रकल्प बीआयएस मार्कसह व्यवसाय परवान्याचा अभाव व पाणी शुध्दीकरणाचे कोणतेही निकष न पाळता विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय.

खेड व शिरुर (जि.पुणे) तालुक्यामध्ये बिना परवाना व बी.आय.एस.परवाना शिवाय पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरचे उत्पादन व विक्री करणा-या ०४ आस्थापनांवर धाडी टाकून कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) होय, मोहोळ (जि.सोलापूर) शहरात मिनरल वॉटर म्हणून साधे पाणी थंड करुन विक्री करीत असल्यावरुन ३ आस्थापनांवर कारवाई करुन उत्पादकांना प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले होते. तसेच कोल्हापूर जिल्हयात ०७ ठिकाणी छापे टाकून ९८१० लिटर पाण्याचा रु. १,२१,१४९/- चा साठा जप्त करण्यात आला आहे,

(४) होय, मोहोळ (जि.सोलापूर) व कोल्हापूर जिल्हयातील प्रकरणांची चौकशी करण्यात आली असून, १० ही आस्थापनांना कलम २६(३) (ब) अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले असून, सदर प्रकरणी चौकशी सुरु असून अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## रायगड जिल्ह्यातील खालापूर व पेण तालुक्यातील कारखानदारांकडून होणारे प्रदूषण

**(२४) * १९५३७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर),श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील कारखानदारांकडून प्रदुषणाबाबतच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच डोलवी (ता. पेण,जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू स्टील लि. कंपनीमुळे परिसरातील अनेक गावांना प्रदूषण होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील औद्योगिकरणामुळे प्रदुषण वाढले असून कारखानदार छुप्या मार्गाने सांडपाणी सोडत असल्याने त्याचा परिणाम शेतीवर झाल्याचे तसेच वायुप्रदुषणामुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर व प्रश्न भाग (२) मधील कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, सदरचे प्रदूषण रोखण्याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

जिल्हा कृषी अधिकारी, रायगड यांच्या माहितीनुसार डोलवी, ता. पेण येथे झालेल्या नुकसानीची संयुक्त पाहणी दिनांक १५.६.२०१५ रोजी करण्यात आली व केलेल्या पंचनाम्यानुसार जेएसडब्ल्यू कंपनीने टाकलेल्या भरावामुळे शेतामधील पाणी जाण्या येण्याचा नैसर्गिक मार्ग (नाला) पूर्णपणे बुजलेला असल्यामुळे शेतामधील पाण्याचा

निचरा होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये कंपनीने टाकलेल्या भरावामुळे तसेच जेटीवरुन येणाऱ्या कच्च्या मालाचे कण वाऱ्यामुळे शेतीमध्ये येऊन शेती नापिक झाली आहे. याबाबतचे शेतीनुकसानीचे पंचनामे तहसिलदार, पेण यांचेकडे सादर करण्यात येत आहेत.

(3) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या दिनांक १.७.२०१५ च्या अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र गडब ता. पेण येथे माहे एप्रिल, मे, जून २०१५ मधील आंतररुग्ण व बाहयरुग्ण नेहमीप्रमाणे असून त्यामध्ये विशेष अशी वाढ दिसत नाही. तसेच प्रदूषणाशी निगडीत असे रुग्णही आढळलेले नाहीत. प्रश्न भाग (१) बाबत मे महिन्यात केलेल्या खालापूर तालुक्यातील उद्योगांच्या सांडपाणी विषयक पाहणीमध्ये आढळलेल्या त्रुटी नुसार जल (प्र.प्र.व.नि.) कायदा १९७४ च्या कलम ३३ अन्वये एका उद्योगास उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रश्न भाग (२) बाबत - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मे. जे. एस. डब्ल्यू. स्टील लि. कारखान्याची नियमित पाहणी करुन हवा तपासणी करण्यात येते. त्यानुसार दिनांक १५.६.२०१५ रोजी केलेल्या पाहणीच्या पृथ:करण अहवालावरुन हवेची गुणवत्ता विहित मर्यादेत असल्याचे दिसून येते.

(५) संबंधित उदयोगांनी सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेची सुधारणा करण्याचा प्रस्ताव सादर केला असून त्याबाबत बँक हमी ही जमा केली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यातील सुमारे चार हजाराहून अधिक शासकीय**
**शाळा बंद पडणार असल्याबाबत**

**(२५) * १६७७५ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश**

**कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शंभुराज देसाई (पाटण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे चार हजाराहून अधिक शासकीय शाळेतील घटती पटसंख्या, सोयी सुविधांचा अभाव, शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा यामुळे सदर शाळा बंद पडणार असून विद्यार्थी संख्येचे निकष बदलल्यामुळे रायगड जिल्हा परिषदेच्या ५६८ तसेच महाड तालुक्यातील १० पेक्षा कमी पटसंख्या असणा-या ११० प्राथमिक शाळा, उरण येथील शाळा तसेच फुलंब्री तालुक्यातील (जि.औरंगाबाद) येथील ३८ वस्ती शाळा बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील डोंगरी व दुर्गम भागातील २० पटाच्या आतील शाळा बंद करण्यात येवू नयेत यासह विविध २० मागण्या प्राथमिक शिक्षकांनी शासनाकडे केल्या आहेत,

(३) तसेच राज्यातील ग्रामीण भागातील एक शिक्षकी शाळा बंद करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असून सदर निर्णयामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील ४६८ शाळा कायमच्या बंद कराव्या लागतील तसेच सध्या राज्यात ३१ मे, २०१५ पर्यंत ३ हजारापेक्षा जास्त १ शिक्षकी शाळा सुरु असुन उक्त निर्णयामुळे या सर्व शाळा बंद कराव्या लागतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासकीय शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारणे, घटती पटसंख्या रोखणे व इतर सोयी सुविधा पुरविणे तसेच एक शिक्षकी शाळा बंद न करणे इत्यादीसह विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ न देता उक्त सर्व शाळेमधील शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बालकांचा मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित इ.सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे, अतिरिक्त शिक्षकाचे/पर्यवेक्षकाचे/मुख्याध्यापकाचे पद मंजूर करणे/कमी करणे, कमीत कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नजिकच्या शाळेत समायोजन करणे, शुन्य विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेतील शिक्षकांची पर्यायी व्यवस्था आणि त्यानुषंगाने शाळांमध्ये संरचनात्मक बदल करण्याबाबत पर्याय सुचविण्यात आले आहेत.

बहुस्तर अध्यापन पध्दती, विद्यार्थ्यांचे समाजिकरण, विद्यार्थ्यांचे समायोजन, अतिरिक्त शिक्षकांचे/मुख्याध्यापकाचे पद निर्माण करणे, नवीन शाळा सुरु करणे आणि शाळांमध्ये संरचनात्मक बदलांबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेमध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयाच्या बांधकामात झालेली अनियमितता

**(२६) * २११३१ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेने सन  २०१४-१५ मध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयाच्या बांधकामात अनियमितता केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, शौचालयासाठी २ शेष खड्डे खोदणे बंधनकारक असताना एकच शेष खड्डा खोदण्यात आलेला आहे तसेच बोगस लाभार्थ्यांच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांनी अनियमितता केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत नागपूर जिल्ह्याकरिता तयार केलेल्या वार्षिक कृती आराखड्यानुसार सन २०१४-१५ या वर्षाकरिता १६,२०८ वैयक्तिक शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. तथापि, स्वच्छ भारत

मिशन (ग्रामीण) तसेच इंदिरा आवास योजना, रमाई योजना व स्वर्ण जयंती योजना या योजनांची सांगड घालून वरील उद्दिष्टांपेक्षा अधिक म्हणजे १८,०७७ शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

या संदर्भात अनियमितता झाल्याचे आढळून आले नसून, कोणत्याही अधिकाऱ्या विरुध्द तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरज (जि.सांगली) येथील शासकीय वैद्यकिय रुग्णालयास सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * २३५५७ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयाच्या इमारती कालबाह्य झाल्या आहेत तसेच तेथे रुग्णांना पुरेशा सुविधा उपलब्ध नसून रक्तपेढीसह अन्य गोष्टींचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याने गोरगरीब रुग्ण उपचारापासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाच्या इमारतीकरिता निधी मंजूर होऊनही अद्यापही रुग्णालयाचे बांधकाम अर्धवट स्थितीत असून वैद्यकीय महाविद्यालयाची जागा संकुलाला देण्यात आली असून सदरील रुग्णालय हे संलग्न असावे अशी स्थानिक नागरिकांची मागणी असून त्यादृष्टीने त्यांनी शासनाकडे निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त रुग्णालयात बर्न वॉर्ड, रक्तपेढी, नर्सिंग कॉलेज, कर्करोग रुग्णालय, स्वतंत्र दंत महाविद्यालय, ट्रॉमा सेंटर विभाग होणे आवश्यक असल्याने या रुग्णालय व महाविद्यालयासाठी सुमारे २०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील रुग्णालयात सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन रुग्णांची गैरसोय दूर करण्याबाबत व सदरील रुग्णालयाच्या बांधकामास निधी त्वरीत मंजूर करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) महाविद्यालयात व रुग्णालयाच्या आवारात कोणतेही बांधकाम अर्धवट स्थितीत नाहीत.

महाविद्यालयाच्या निवासस्थान परिसरातील जागा तालुका क्रिडा अधिकारी तथा सचिव तालुका क्रिडा समिती, मिरज आणि चेअरमन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांना देण्यात आली आहे.

याबाबत शासनाकडे निवेदन प्राप्त झालेले आहे.

शा.वै.म. मिरज व पद्मभूषण वसंतदादा पाटील शा.रुग्णालय, सांगली या संस्थेचे संलग्नित दैनंदिन प्रशासकीय व रुग्णालयीन कामकाज हे अधिष्ठातांच्या नियंत्रणाखाली आहे.

(३) हे खरे नाही.

शा.वै.महाविद्यालय, मिरज येथे बर्न वॉर्ड व रक्तपेढी च्या कामासाठी शासनस्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामे केंद्र शासनाच्या निधीमधून करण्यात येणार आहेत, नर्सिंग कॉलेजसाठी इमारती उपलब्ध असून जीएनएम हा कोर्स सुरु करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार पद्मभूषण वसंतदादा पाटील शा.रुग्णालय, सांगली येथे कर्करोग रुग्णालय सुरु करण्यासाठी कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरु आहे.

स्वतंत्र दंत महाविद्यालय, ट्रॉमा सेंटर विभाग सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास प्राप्त नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील रेंज सेकंडरी स्कुल, खडकी या शाळेतील बेकायदा शिक्षक मान्यतेबाबत कारवाई होण्याबाबत**

**(२८) * २४३१५ श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रेंज सेकंडरी स्कुल, खडकी या शाळेतील बेकायदा शिक्षक मान्यतेबाबत मा.उपसंचालक शिक्षण विभाग, पुणे यांनी चौकशी करुन या चौकशीचा अहवाल शिक्षण आयुक्त, म.रा.यांच्याकडे पाठविल्याने त्यावर त्वरीत कारवाई करावी अशा प्रकारचे निवेदन दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी (हडपसर) यांनी मा.शिक्षण आयुक्त, म.रा.पुणे १ यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून यासंदर्भात दोषी अधिकाऱ्यांवर दोषारोप पत्र बजावणे व तद्नुषंगिक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर आणि सेलु (जि.परभणी) तालुक्यात निकृष्ट दर्जाचा शालेय पोषण आहार पुरविण्यात आल्याबाबत

**(२९) * २४५४५ श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर आणि सेलु तालुक्यात (जि.परभणी) निकृष्ट दर्जाचा शालेय पोषण आहार पुरविण्यात येतो अशी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचेकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व तदनुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरविण्यात येत असलेला तांदुळ निकृष्ठ दर्जाचा असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरविण्यात येत असलेला तांदुळ भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त होतो. सदर प्रकरणी लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारींनुसार चौकशी करण्यात आली असून जिंतूर व सेलू तालुक्यातील (जि.परभणी) शालेय पोषण आहार योजनेसाठी पुरविण्यात येणारा तांदुळ चांगल्या प्रतीचा असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील खाजगी शिक्षण संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काबाबत**

**(३०) * १६३२७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.वारीस पठाण (भायखळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. उन्मेष पाटील (चाळीसगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शिक्षण संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्कासंदर्भात कोणतेही निश्चित धोरण नसल्याने असंख्य शाळांमध्ये प्रतिवर्षी २५ हजार ते २-३ लाख रुपयापर्यंत विविध प्रकारचे शुल्क वसूल केले जात असल्याच्या विरोधात दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी फोरम फॉर फेअरनेस एज्युकेशन या संस्थेच्या माध्यमातून पालकांनी मुंबईतील आझाद

मैदानात जोरदार निदर्शने केली, तसेच याबाबत फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन या स्वयंसेवी संघटनेने मा. मुख्यमंत्री , मा. शालेय शिक्षण मंत्री यांना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी पत्रही दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक खाजगी शाळेत देणगी घेण्यास कायद्यानुसार बंदी असताना सर्व शाळा आणि त्यांचे संस्थाचालक देणग्या घेतल्याशिवाय मुलांना शाळेत प्रवेश देत नाहीत असे असताना शिक्षण विभागाकडून याप्रकरणी कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच गोरेगाव पश्चिमेकडील गोरेगाव एज्युकेशन सोसायटी या दिल्ली बोर्डाच्या शाळा व्यवस्थापनाने सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात केजीच्या १२ विद्यार्थ्यांच्या पालकांकडून जास्त शुल्क वसूल केल्याबाबत पालकांनी व्यवस्थापनाकडे दाद मागितली असताना त्यांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली नसल्याचे दि. १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, तसेच बोरिवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेतील २४ विद्यार्थ्यांना फी न भरल्याचा शेरा दिल्याने अन्य शाळांनी त्यांना प्रवेश नाकारला असून सदर शाळेकडून इमारतीचे बांधकाम चालू असताना विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी वार्षिक रु.६८,००० इतकी फी आकारण्यात येऊन याच इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इतर विद्यार्थ्यांकडून १,१७,००० इतक्या रुपयांची फी आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबई महापालिका क्षेत्रातील खासगी शाळांमधील प्रवेश मिळालेल्या वंचित व दुर्बल घटकांतील सुमारे १०० विद्यार्थ्यांकडून शाळांनी शुल्क मागितल्याने विद्यार्थ्यांचे प्रवेश अद्याप निश्चित नसल्याने विद्यार्थ्यांना प्रथम चेकव्दारे प्रवेश शुल्क भरण्याची सक्ती शाळांकडून करण्यात येत असून राज्यातील शिक्षण हक्क कायद्यांतर्गत सुरु असलेल्या ऑनलाईन प्रवेशासाठी तीन दिवस मुदत वाढवूनही ८९० विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ मध्ये प्रवेश मिळाला नाही. सुमारे ११ हजाराहून अधिक जागांसाठी सुरु असलेल्या प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीत सुमारे तीन हजार विद्यार्थी पात्र ठरले मात्र शुल्काबाबत शाळांनी अडवणुक केल्याने अनेक विद्यार्थी यावर्षी शिक्षणापासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषी शाळांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याकरिता शाळेव्दारे आकारण्यात येणाऱ्या शुल्कास प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) फोरम फॉर फेअरनेस एज्युकेशन या संस्थेकडून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मध्ये काही सुधारणा सुचविणारे पत्र एप्रिलच्या सुमारास प्राप्त झालेले आहे.

(२) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास देणगी प्रतिबंधक कायद्यानुसार संबधित शाळेवर कारवाई करण्यात येते.

(३) गोरेगाव एज्युकेशन सोसायटी या शाळेबाबत अंशत: खरे असून बोरीवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेची बाब खरी आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकारक्षेत्रातील वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना २५ टक्के आरक्षणांतर्गत सन २०१५-१६ मध्ये प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या एकूण ११,४०१ प्रवेश अर्जामधून छाननीअंती एकूण ३४८८ अर्ज प्रवेशासाठी पात्र झाले आहेत. पात्र अर्जापैकी एकूण १३८८ बालकांचे प्रवेश शाळांमध्ये झाले असून उर्वरित बालकांना शाळांनी प्रवेश नाकारले होते. याबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या असून प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे. तथापि दिनांक २९.४.२०१५ पूर्वी अस्तित्वात असलेल्या शासन धोरणानुसार/आदेशानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी अशा सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेच्या शुल्क वाढी संदर्भात पालकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली होती. त्यावर मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक १५.६.२०१५ रोजी पालकांनी वाढीव फी जमा करणेबाबत आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थाकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) २०११ अधिनियम दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील अन्न महामंडळाच्या गोदामातील धान्याची ब्रान्डेड कंपनीच्या नावाखाली होत असलेली विक्री

**(३१) * २२०९४ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (FCI) ची धान्याने भरलेली

पोती खाजगी गोदामामध्ये रिकामी केली जात असल्याचे दिनांक १३ एप्रिल,२०१५ रोजी वा सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित धान्य ब्रान्डेड कंपनीच्या पोत्यामध्ये भरून त्याची अधिक दराने विक्री करण्याचे काम कळमना (नागपूर) येथील काही गोदामामध्ये सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित व्यापाऱ्यांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) या आशयाच्या बातम्या स्थानिक वृत्तपत्रात दि.१४ एप्रिल, २०१५ व त्या सुमारास प्रसिध्द झाल्या. त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली. त्यानुसार प्रश्नात नमूद धान्याचा संबंध सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वितरीत करावयाच्या धान्याशी नसल्याचे आढळून आले आहे. बातमीत नमूद क्रमांकाचे वाहनातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या धान्याची वाहतुक करण्यात आलेली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच रास्तभाव दुकानांच्या तपासण्याअंती देखील सदर साठा सार्वजनिक वितरण व्यवस्थेशी संबंधीत नसल्याचे आढळले आहे.

-----------------

## राज्यात गर्भपाताकरिता असलेल्या औषधांची ऑनलाईन विक्री होत असल्याबाबत

**(३२) * १६८२८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत**

**(नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्त्रीभ्रूणहत्या बंदी राबविली जात असताना गर्भपातासाठी व इतर औषधे ज्या औंषधाचे प्रिस्क्रिप्शन फक्त पात्र डॉक्टर व स्त्रीरोग तज्ञच देऊ शकतात आणि त्यातही लैगिंक उत्तेजन देणारी औषधे व एस्कोरील कफ सिरप आणि व्हीगोरा औषध विक्रीचा परवाना नसलेल्या स्नॅपडील कंपनीने मोठया प्रमाणावर ऑनलाईन विक्री केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या माहे मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे व माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने स्नॅपडील कंपनीच्या गोरेगाव (पश्चिम) येथील कार्यालयावर छापा घातला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गर्भपाताची किटस् किंवा सिल्डेनाफिल या कामोत्तेजक औषधांचे पर्यायही सध्या उपलब्ध नाहीत असे असतानाही काही दिवसांपूर्वी ऑर्डर नोंदवलेल्या औषधाची डिलिव्हरी नाशिकमधील एका खरेदीदार नितीन औटी यांनी सिल्डेनाफिल हे लैगिक क्षमतावृध्दीचे व्हायाग्रा प्रकारातील औषध शॉपक्लूजवरुन मागविले असता कुरिअरमार्फत हाती पडल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, औषध विक्रीचा परवाना नसताना औषधांची सर्रास ऑनलाईन विक्री केल्याबद्दल राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने स्नॅपडील या ई कॉमर्स वेबसाईटचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल बहल व संचालक मंडळाविरोधात गुन्हा दाखल केल्याचे दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर गैरव्यवहाराची सीबीआय चौकशी करावी व इंटरनेट औषधविक्रीबाबत सुस्पष्ट राष्ट्रीय धोरण ठरवावे अशी मागणी करणारे तत्कालिन आयुक्तांनी कैंद्रीय औषध महानियंत्रकांना दिलेले पत्र व ऑनलाईन औषधांची विक्री करत असताना सहभागी असलेल्या व्यक्ती, मेडिकल स्टोअर्स, कंपनी तसेच करार कागदपत्रे अन्नऔषध प्रशासनाकडे उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग (१), (२), (३) व (४) या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, दिनांक ०६/०५/२०१५ रोजी श्री. नितीन औटी, नाशिक यांनी शॉप क्लुज कॉम या संकेतस्थळावर ऑनलाईन मागणी नोंदवून विना प्रिस्क्रिप्शन १२X९ टॅब्लेट मॅनफोर्स, सं.क्र. DAL No ९९ उत्पादक, मे सिरमोर रेमेडिज (प्रा.) लि. पोटा साहीब, हिमाचल प्रदेश हे औषध खरेदी केल्याचे कळविले आहे.

(३) होय, स्नॅपडील कॉम चे मालक मे.जस्पर इंफोटेक प्रा.लि.या संस्थेविरुध्द तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कुणाल बहल, संचालक व इतर संबंधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० च्या कलम १८ (अ), १८ (क), २२(१)(सीसीए) सहवाचन कलम ३४ तसेच औषधे व जादुटोणादी उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा १९५४ च्या कलम ३, ४ व सह वाचन ९ च्या उल्लंघनाबाबत पनवेल शहर पोलिस ठाणे, पनवेल येथे प्रथम माहिती अहवाल दाखल केला असून, सीआर क्र. १०/२०१५, दिनांक १/५/२०१५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

सीबीआय चौकशीची मागणी केलेली नाही. तथापि, अशा प्रकारच्या उल्लंघनांना आळा घालण्यासाठी योग्य कारवाई घेण्याबाबत औषध नियंत्रक, भारत सरकार यांना दिनांक २८/४/२०१५ अन्वये कळविले आहे.

(५) सदर प्रकरणी स्नॅपडिल कॉमची संस्था मे.जस्पर इंफोटेक प्रा.लि. या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, विक्रेते यांचेविरुध्द पनवेल शहर पोलिस ठाणे पनवेल येथे एफआयआर क्र. II११०/२०१५ दि. १/५/२०१५ अन्वये विना परवाना औषध विक्रि व इतर उल्लंघनाबाबत गुन्हा दाखल केला आहे.

तसेच शापक्लुज कॉम ची संस्था मे. क्लुज नेटवर्क प्रा.लि. या संस्थेचे संचालक विक्रेते यांचे विरुध्द पनवेल शहर पोलिस ठाणे येथे एफआयआर क्र. ११/२०१५, दि.७/५/२०१५ अन्वये विना परवाना औषध विक्री व इतर उल्लंघनाबाबत गुन्हा दाखल केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ऑक्झिलरी नर्सिंग अॅण्ड मिडवायफरी संस्थेची संचालकांनी (एएनएम) अभ्यासक्रमाच्या ५०६ संस्थांनी केलेला गैरव्यवहार**

**(३३) * १८१३४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग**

**बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राजेश काशीवार (साकोली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक संस्थांनी सन २०१०-११ ते २०१४-१५ या वर्षात महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलमार्फत रितसर मंजूरी न घेता एएनएम/जीएनएम अभ्यासक्रमाची विना परवाना महाविद्यालये सुरु करुन विद्यार्थीनींची बोगस संख्या व हजेरीपट दाखवून कोट्यवधी रुपयांची शिष्यवृत्ती व सरकारी अनुदान घेवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील ऑक्झिलरी नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी (एएनएम) अभ्यासक्रमाच्या ५०६ संस्थांनी गेल्या दोन ते तीन वर्षात बोगस विद्यार्थी दाखवून केंद्र शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग एक व दोन प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार या प्रकरणी संबंधित संस्था चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेमध्ये सर्वशिक्षा अभियानअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या फोटोफ्रेम मध्ये झालेला गैरव्यवहार

**(३४) * १९२३६ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेमध्ये सर्वशिक्षा अभियान अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या महापुरुषांच्या फोटो फ्रेम मध्ये ५४ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दि.२५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ३ लाख रुपयांहून अधिक खरेदी करताना अथवा काम करताना त्या कामाची निविदा ऑनलाईन पध्दतीने सुरु केली असतानाही, उक्त जिल्हा परिषदेने ५४ लाख रुपयांच्या फ्रेमची खरेदी करताना कुठलीही ई-टेंडर अथवा निवीदा प्रक्रिया राबविली नाही, हेही खरे आहे काय,

(३) तसेच या फ्रेमची खरेदी करताना शिक्षण मंडळ सभापतीसह कुठल्याही पदाधिका-याला कल्पना देण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) नाही.

(३) व (४) फोटो फ्रेम खरेदीबाबत पदाधिका-यांना तोंडी कल्पना देण्यात आली होती. परंतू खरेदीबाबतचा सविस्तर अहवाल त्यांच्या निदर्शनास आणण्यास विलंब झाल्याने तत्कालीन उपशिक्षणाधिकारी यांचेकडील सर्व शिक्षण अभियान कार्यक्रमाचा पदभार काढून घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कुपनलिका खोदण्यासंदर्भात लागू केलेले निर्बंध

**(३५) * १७२३१ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर),**

**श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण), श्री. बबनराव शिंदे (माढा),श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणी पुरवठ्यासाठी भूगर्भात ६० मीटरपर्यंतच कुपनलिका खोदाव्यात असे निर्बंध महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लागू केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र भूजल (व्यवस्थापन व विकास) कायदा असतानाही गावोगावी हजार-हजार फूट बोअरवेल खणून भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतांवर अतिक्रमण करणाऱ्यावर प्रतिबंध घालण्यासाठी ६० मीटर खाली बोअरवेल किंवा उपसा करण्यास महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने निर्बंध घातले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागात ६० मीटरपर्यंत कुपनलिकांना पाणी उपलब्ध होत नाही, तसेच भूपृष्ठावर पाण्याचा साठा उपलब्ध नाही अशा क्षेत्रात पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी संस्थात्मक तसेच लोकशिक्षणात्मक व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) नाही. या संदर्भात निर्बंध घालण्याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर भागात महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील कलम ८ (१) च्या परंतुकानुसार, पिण्याच्या पाण्यासाठी खोल विहीर, राज्य भूजल प्राधीकरणाच्या परवानगीने खोदणेची तरतूद आहे.

त्याचप्रमाणे कृत्रिम पुनर्भरणासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाचा कार्यक्रम हाती घेतलेला असून, जलसंधारण विभागामार्फत विविध पारंपारीक कामे केली जातात. त्याचप्रमाणे भूजलावर आधारीत पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरणासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत १२३२३ गावांमध्ये ३२१८९ कामे शिवकालीन व राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत पुर्ण करण्यात आलेली आहेत.

(४) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आजवर संस्थात्मक, लोकशिक्षणासाठी व अधिका-यांच्या क्षमता बांधणीसाठी नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांसाठी विभागीय स्तरावर एकत्रित व उर्वरित ४ विभागांतील जिल्ह्यांसाठी जिल्हास्तरावर मिळून २३ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे ग्रामस्तरावर कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करुन त्यात अधिनियमाच्या सामुहीक वाचनासाठी ग्राम विकास विभागामार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे तालुकास्तरावर लोकप्रतिनिधी, उपभोक्ते व अधिका-याच्या लोकशिक्षणासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रतिजैविके औषधांचा तुटवडा दूर करण्याबाबत

**(३६) * २१९९९ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय बाजारपेठेत सध्या हृदयरोगासाठी लागणारे टिनॅक्टिप्लेज, यकृत वा मुत्रपिंडाच्या प्रत्यारोपणासह अतिशय गुतांगुतीच्या शस्त्रक्रियेनंतर वापरण्यात येणारे हयुमन अल्बुमिन, कर्करोगग्रस्तांना किमोथेरपीसाठी वापरण्यात येणारे कार्बोप्लॅटिन, रक्तातील युरिक ॲसिडचे प्रमाण नियंत्रणात आणणारे झायलोरिक तसेच विविध शस्त्रक्रिया वा उपचार पध्दतीत वापरण्यात येणाऱ्या प्रतिजैविकांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्या जास्त नफा मिळविण्यासाठी सदर महत्वाची जीवनरक्षक औषधे परदेशात निर्यात करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर औषधांचा तुटवडा झाल्यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तद्नुसार रुग्णांना सदर औषधे बाजारात सहजपणे उपलब्ध होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

२० मे, २०१५ रोजी कोल्हापूर येथील दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता, माहे, मे, २०१५ मध्ये कोल्हापूर सह महाराष्ट्राच्या इतर जिल्हयात सदर औषधांचा साठा उपलब्ध असल्याचे आढळले आहे.

(२) लागू नाही.

(३) कोल्हापूर जिल्हयातील औषध विक्रेत्यांकडे चौकशी करण्यात आली असता, माहे मे, २०१५ मध्ये कोल्हापूर सह महाराष्ट्राच्या इतर जिल्हयात सदर औषधांचा साठा उपलब्ध असल्याचे आढळले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयातील कागल औद्योगिक वसाहतीतील रसायनयुक्त पाणी कसब सांगावसह अनेक गावात सोडले जात असल्याबाबत**

**(३७) * २१४९४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील कागल पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील रसायन मिश्रीत पाणी कसब सांगावसह अनेक गावात सोडले जात असल्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शंभर एकर जागेवर पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये मेट्रो हायटेक ही कंपनी गत दहा वर्षापासून सुरु असुन या कंपनीचे वेगवेगळे असे १४ प्रकारचे उद्योग सुरु असून या कंपनीचे रसायन मिश्रीत पाणी कसब सांगाव गावच्या परिसरात सोडून देण्यात येत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीचा सामुदायिक सांडपाणी (एसटीपी) प्रकल्प सुरु झाल्यापासून बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे या प्रकल्पातून रसायनयुक्त पाणी जवळच असणा-या कालव्यामध्ये मिसळत असून कंपनीला लागूनच असणा-या वसाहतीतील कूपनलिका विहिरी या मुख्य पाण्याच्या स्त्रोतातही रसायनयुक्त पाणी मिसळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी कंपन्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे अहवालानुसार माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान कसब सांगाव भागात कोणत्याही प्रकारच्या साथीचा उद्रेक झाला नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सदर कंपनीचा एसटीपी प्रकल्प जून २०१५ पासून कार्यान्वित केला आहे.
(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीअंती सदर प्रकल्पातील सांडपाणी कालव्याशेजारील एका खड्डयात निर्गत केल्याचे आढळून आले. तथापि, कालव्यामध्ये कोणतेही रासायनिक सांडपाणी जात नसल्याचे निदर्शनास आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे अहवालात नमुद केल्यानुसार सदर भागातील पाण्याचे नमुने दरमहा तपासणीसाठी घेतले जातात. माहे एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत घेण्यात आलेले नमुने योग्य आले आहेत. वर्षातून दोनदा सर्व पाणी स्त्रोतांचे रासायनिक पृथ:क्करण करण्यात येते. सदर पृथ:क्करण अहवालानुसार पाण्यामध्ये कोणतेही रासायनिक घटक नसल्याचे आढळून आले आहे.
(५) सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी/तपासणी करण्यात आली. तपासणीअंती संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी आणि वैध संमतीपत्र प्राप्त न करणे तसेच औद्योगिक/घरगुती स्वरुपाचे सांडपाणी विनाप्रक्रिया बाहेरील परिसरात सोडल्याने चार कंपन्यांवर बंदचे आदेश बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देहू (जि.पुणे) येथील नवीन पाणी योजना प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * २४२६८ श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देहूगाव (जि.पुणे) येथील बोडकेवाडीतील शेतकरी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात समझोता होत नसल्याने देहूतील नवीन पाणी योजनेचे काम दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांअंतर्गत रूपये ८ कोटी ५२ लाख खर्च करुन ही योजना माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजना पूर्ण होत नसल्याने देहूमध्ये पाणी असूनही ग्रामस्थ आणि लाखो भाविकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन विचारविनिमय करुन योजनेचा आढावा घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तरी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे असून देहू येथील पाणी पुरवठा योजनेतील जलशुध्दीकरण केंद्राचे काम दिनांक ३०/८/२०१४ पासून शेतकऱ्यांच्या विरोधामुळे बंद आहे. योजनेची पाईप लाईन व इतर कामे सुरु आहेत.

(२) श्रीक्षेत्र देहू-आळंदी-पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत जिल्हाधिकारी, पुणे यांनी सदर कामाचे रु.८.५२ कोटी किंमतीचे कार्यारंभ आदेश दिनांक २२/१/२०१३ रोजी देण्यात आले असून या कामावर आतापर्यंत रु.४.३० कोटी खर्च झाला आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदर कामास खालील कामांमुळे विलंब होत आहे.

(अ) पाईप लाईन चे मार्गात असलेली अतिक्रमणे व त्यामुळे पाईप लाईनचे मार्गात झालेला बदल.

(ब) जलशुध्दीकरण केंद्राचे काम करण्यास शेतकऱ्यांनी केलेला विरोध.

-----------------

### राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने शुल्क वाढविल्याबाबत

**(३९) * १८६७७ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी सन २०१५ पासून रुपये ६० ऐवजी रुपये १९५० व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकडून रुपये ३० हजार शुल्क घेण्यास शासनाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शुल्क वाढीमुळे राज्यातील बरेच विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे औद्योगिक प्रशिक्षणापासून वंचित राहणार असल्याने उक्त प्रशिक्षण संस्थेची वाढलेली शुल्क कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) अद्यापपर्यंत प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेली नसून उपलब्ध जागांसाठी ऑगस्ट २०१५, सत्रासाठी आजतागायत २,६०,३४५ (दोन लाख साठ हजार तीनशे पंचेचाळीस) इच्छुक उमेदवारांचे प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहेत.

राज्यातील फी वाढीमुळे कोणताही पात्र उमेदवार औद्योगिक प्रशिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. त्यामुळे सद्यःस्थितीत फी कमी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचाराअभावी नवजात शिशूचा झालेला मृत्यू

**(४०) * २३४६३ प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय शासकीय रुग्णालयात वैद्यकीय उपचारा अभावी आदिवासी महिला व तिच्या नवजात शिशूचा दि.१० मे २०१५ च्या दरम्यान मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त रुग्णालयात पदे रिक्त असल्याने जिल्ह्यातून येणाऱ्या गर्भवती महिलांना सोनोग्राफी करण्याकरीता २० दिवसापर्यंत तारखा देण्यात येत असल्याचे दिनांक १५ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त रुग्णालयातील स्वीय प्रपंच विभागात रुग्णांकडून सेवाशुल्क आकारले जाऊन ती रक्कम रुग्णालयाच्या स्वीय प्रपंच खात्यात जमा करताना योग्य रक्कमेच्या पावत्या न फाडता सदरील रक्कमेचा अपहार करण्यात आला असून याबाबत संबंधित विभागामार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली असून रुग्णालयातील सर्जीकल, किरकोळ भांडार आणि किचन व्यवस्थेतही गैरप्रकार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कार्यवाही केली व संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) रुग्ण सेवा शुल्काबाबत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असून त्याअनुषंगाने संबंधितांविरुध्द चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापि रुग्णालयातील सर्जिकल किरकोळ भांडार आणि किचन व्यवस्थेत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) रुग्ण शुल्काबाबत संबंधिता विरुध्द चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. प्रश्न भाग (१) व (२) बाबत कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील किल्ल्यावरील वास्तूंचे जतन व गडांचे मॅपिंग करण्याबाबत

**(४१) * १७९१९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिडशेहून अधिक किल्ल्यांवरील वास्तुंचे संवर्धन व गडांचे मॅपिंग करण्याची महत्वाकांक्षी योजना वनविभागाच्या परवानगी अभावी रखडल्याने यासाठी राज्य वन विभागाला परवानगीबाबतचे अधिकार देण्यात यावे अशी राज्यातील दुर्गसंवर्धन संस्थांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्वपूर्ण गड व किल्ले यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी मा.शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किल्ल्यांच्या संवर्धनाची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी प्रश्न भाग (१) मधील मागणीच्या अनुषंगाने तसेच प्रश्न भाग (२) मधील बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार राज्य शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यात जिल्हानिहाय ऐतिहासिक किल्याचे गॅझेटियर करण्याचा शासनाने दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय नियोजन केले व सदर गॅझटियरचा तपशिल काय आहे तसेच सदर योजनेअंतर्गत किल्याचे संवर्धन करण्याचे दृष्टीने शासनामार्फत कोणकोणत्या योजना व कामे हाती घेण्यात येणार आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही,
(२) होय,
(३) गड किल्ले संवर्धन समितीची मा. मंत्री (सां.का.) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली. सदर समितीच्या पहिल्या बैठकीत सर्व गड किल्ल्यांचे मॅपिंग करण्यात यावे असे समिती सदस्यांनी मत व्यक्त केले. सदर समितीच्या तीन बैठका झाल्या असून राज्यातील गड किल्ले संवर्धनाशी निगडीत असलेल्या विविध संस्थांची पुरातत्व विभागाकडे अधिकृत नोंदणी करुन त्या संस्थांची विभागीय स्तरावर कार्यशाळा घेण्यात यावी असे ठरले. त्यानुसार जुलै मध्ये कार्यशाळा घेण्याचे प्रस्तावित आहे.
(४) व (५) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने 'बीपीएड अभ्यासक्रम' एक वर्षासाठी बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(४२) * १८३५० श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),**

**श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने 'बीपीएड अभ्यासक्रम' एक वर्षासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शारिरीक शिक्षण विभागातील शिक्षकांच्या, विद्यार्थ्यांच्या तक्रारी व विभागातील इतर सदस्यांचे निवारण करण्याच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत ठराव मंजूर करण्यात आला आहे.

(३) या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेत (ता.म्हसाळा, जि.रायगड) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजना पूर्ण झाली नसल्याबाबत

**(४३) * २०३६० श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेत (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील भारत राष्ट्रीय पेयजल अंतर्गत संदेरी-आंबेत पाणीपुरवठा योजना ही सन २०११ मध्ये सुरु झाली. योजनेचा कालावधी दीड वर्षाचा होता. परंतु, निधी उपलब्ध असूनही सदर योजनेचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही, खरे आहे काय,

(२) तसेच, आंबेत येथील तीव्र पाणी टंचाईमुळे गावातील महिला व अन्य मंडळीनी भ्रष्टाचार निर्मुलन जनसंघटनेच्या वतीने दिनांक ७ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा नेऊन सरपंच व अन्य सदस्यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील निवेदनानुसार सरपंच यांनी योजना तात्काळ कार्यान्वित होणेबाबत मा.मुख्यमंत्री महोद्यांना पत्रव्यवहार केला आहे तसेच प्रश्न भाग (१) बाबत दि.२० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बापदेव सहाय्यक मंडळ आंबेत यांनी उक्त योजनेबाबत योग्य ती चौकशी करण्याची व ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्याची विनंती मा. जलसंपदा राज्यमंत्री यांना पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त योजना पूर्ण करण्याबाबत व नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) उक्त प्रकरणाबाबत दि. ११/०५/२०१४ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती म्हसळा व उप अभियंता, उप विभाग, म्हसळा यांनी संयुक्त चौकशी केली आहे. सदरचे काम माहे डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत**

**(४४) * १७४५१ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत विद्यमान आर्थिक वर्षात ३९ नळ योजना पूर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. त्यासाठी शासनाकडून १२ कोटी रुपयांचा निधीही देण्यात आला होता. मात्र त्यापैकी केवळ पाच कोटी रुपयांचाच निधी खर्च झाला असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कळमनूरी तालुक्यात पावसाचे अत्यल्प प्रमाण राहिल्याने भूजल पातळी खालावली असल्याने अनेक ठिकाणी बारमाही पाणी असलेल्या विहिरी, विंधन विहिरी कोरड्या पडल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) हिंगोली जिल्ह्यातील पुरजळ, सिध्देश्वर व गाडीबोरी या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करुन घेण्यास स्थानिक जिल्हा प्रशासनाकडून नकार दिला जात असून पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव टंचाई आराखड्यात की देखभाल दुरुस्तीमध्ये घ्यावयाचे यावर जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिका-यांमध्ये एकमत होत नाही तसेच सन २०१५ च्या उन्हाळ्यात पाणी टंचाई निवारणार्थ तयार करण्यात आलेली कृती आराखड्यामधील उपाय योजनांची अंमलबजावणी माहे मे, २०१५ अखेर पर्यंत होऊ शकली नाही व त्यामुळे नागरिकांना भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागमाथा (ग्रा.प.गोरेगाव, ता.सेनगांव) तसेच बळसोंड व मालवाडी, (ता.जि.हिंगोली) येथे तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे त्याठिकाणी वाढीव किंवा पुरक पाईपलाईन, मोटारपंप व पाण्याची टाकी तसेच हिंगोली नगरपरिषद पाणी पुरवठा योजनेमधून पाणी पुरवठा करणे अशा उपाययोजना करण्याबाबत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यातील तीव्र पाणीटंचाई निवारणार्थ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरलेल्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशतः खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यात ३९ नळ योजना पुर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. त्यासाठी शासनाकडून एकूण प्राप्त निधी रु. १४७५.१८ लक्ष पैकी रु. ८७१.०४ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

कळमनुरी तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भुजल पातळी खालावली आहे काही ठिकाणी विहिर व विंधन विहिरी कोरड्या पडल्याने पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

(३) हिंगोली जिल्ह्यातील पुरजळ, सिध्देश्वर व गाडीबोरी या तीनही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात आल्या, पुरजळ योजनेतील २० गावांपैकी १५ गावांना तसेच सिध्देश्वर योजनेतील २३ गावांपैकी ११ गावांना आणि गाडीबोरी योजनेतील ०८ गावांपैकी ६ गांवाना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून, उपरोक्त योजना दुरुस्तीनंतर हस्तांतरीत करुन घेऊन शिखर समितीच्या ताब्यात देण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर करण्यात येत आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) हिंगोली जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना जसे विहिर अधिग्रहण, टँकर नवीन विधन विहिरी घेणे, नळ योजना विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरता पुरक नळ योजना इत्यादी उपाययोजना टंचाईकृती आराखड्यानुसार व भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने सुचविल्यानुसार आवश्यक ती उपाययोजना करुन टंचाई निवारण करण्यात आले आहे. कृती आराखड्यातील उपाययोजनेची अंमलबजावणी संबंधित उप अभियंता व गटविकास अधिकारी, यांच्याकडून अहवाल मागवून कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात अन्नधान्य व तृणधान्याच्या उत्पादनात तूट निर्माण झाल्याबाबत**

**(४५) * २०३४३ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चु कडू (अचलपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ३ वर्षापासून निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ आदी अन्न धान्यांचे उत्पादन घटले असून नागरिकांना अन्न धान्यांच्या तुटवडा निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गव्हाचे उत्पादन एकूण गरजेच्या ५२.४३ लाख टन तर तांदूळ ११ लाख ४५ हजार टन इतका कमी उत्पादित झाला असून तृणधान्यांच्या उत्पादनात एकूण गरजेच्या १६ लाख ८० हजार मेट्रिक टन इतकी तूट निर्माण झाली असून वर्षभर पुरेल इतकेही उत्पादन झालेले नाही तसेच निर्यातीमधील घट यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

-----------------

## मौजे वाजेगांव, घाणबी, काढाली, गावडेवाडी व धनगरवाडी पाणेरी (ता.पाटण,जि.सातारा) येथील पाणी योजनांच्या निकृष्ट कामांची चौकशी करणेबाबत

**(४६) * २१८९९ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाजेगांव, घाणबी, काढाली, गावडेवाडी व धनगरवाडी कसणी (ता.पाटण, जि.सातारा) याठिकाणी शासनाने राष्ट्रीय पेयजल तसेच भारत निर्माण योजनेतंर्गत पिण्याच्या पाण्याच्या योजनांची कामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या योजनांची कामे अतिशय निकृष्ट करुन संबधित ठेकेदारांनी मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनांची कामे अतिशय निकृष्ट झाल्याने सदर गावांतील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने झालेल्या कामांची उच्चस्तरीय चौकशी करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचेकडे ग्रामस्थांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास ,या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणी पुरवठा सुरळीत सुरु होण्याकरिता व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, चौकशी न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) होय, चौकशी करण्याबाबतची मागणी केली आहे.

(४) याबाबत, चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मोहाडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे नवीन नळयोजना कार्यान्वित करणेबाबत

**(४७) * २१४९८ श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे सन १९७२ ला नळयोजना कार्यान्वित करण्यात आली असून त्यासाठी ४० फुट उंच तयार करण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीला ४२ वर्षे पुर्ण झाली असून सदर नळयोजना २५ वर्षानंतर कालबाह्य घोषित करुन नवीन नळयोजना कार्यान्वित करणे आवश्यक असताना अद्याप कार्यान्वित करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची टाकी ठिकठिकाणी जीर्ण झाली असून पाईपलाईन ७/८ फूट खोलवर गेल्यामुळे येथील नागरिकांना चार-चार दिवस पिण्याच्या पाण्यासाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे जून २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी नवीन पाणी टाकी व पाईपलाईन टाकण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदर नवीन नळयोजना किती कालावधीत कार्यान्वित होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

पाण्याची आवक कमी झाल्यामुळे गावाला पाणी कमी पडत होते. त्यामुळे माहे मे व जून २०१५ मध्ये ३ दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत होता.

(३) मोहाडी ग्रामपंचायत यांचेकडून नवीन पाणी पुरवठा योजना जलशुध्दीकरण केंद्रासह राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मंजूर करण्याबाबतचा ठराव दि. ३.१२.२०१४ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर यांचेकडे पाठविण्यात आला होता. तथापि, सदर ग्रामपंचायत ही दिनांक १२.०२.२०१५ पासून "नगर पंचायत" घोषित झाल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत या योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयातील धान्य वाटप गैरव्यवहारातील**
**तहसिलदारांच्या निलंबनाबाबत**

**(४८) * २०७९० श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : तारांकित प्रश्न क्रमांक १०४७५ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील धान्य वाटप गैरव्यवहारामध्ये तहसिलदारांसह १७ अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची घोषणा मा. अन्न नागरी पुरवठा मंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर कार्यवाहीच्या अनुषगांने महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुरवठा काम करण्यास नकार दर्शविल्यामुळे दोन लाख क्विंटल धान्य वितरण ठप्प झाल्याने नाशिक जिल्हयातील जवळपास १२ लाख शिधापत्रिकाधारक हे स्वस्त धान्यापासून वंचित असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाशिक जिल्हयातील धान्य वाटप गैरव्यवहारामध्ये तहसिलदारांसह १४ अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची घोषणा मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांनी सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात केली होती.

(२) नाशिक जिल्ह्यातील ७ तहसिलदारांना निलंबित केल्याने सदर निलंबाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुरवठा विभागाचे काम करण्यास नकार दर्शविल्याने दि.२० मे ते २ जून २०१५ या कालावधीत धान्य वितरणावर काही प्रमाणात परिणाम झाला होता.

(३) विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीच्या अहवालानुसार व जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अहवालानुसार तत्कालिन तहसिलदार, पेठ, दिंडोरी, सिन्नर, निफाड, नाशिक, त्र्यंबकेश्वर, धान्य वितरण अधिकारी, नाशिक यांचा सुरगाणा येथील शासकीय धान्य गोदामामध्ये झालेल्या धान्य अपहार प्रकरणाशी संबंध दिसून येत नाही. तहसिलदार, इगतपूरी यांनी माहे सप्टेंबर, २०१४ अखेरची केलेली त्रैमासिक गोदाम तपासणी अहवाल उपलब्ध अभिलेखावरुन संशयास्पद असल्याने त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केला असल्याचे दिसून आले आहे. याबाबत तहसिलदार, इगतपूरी यांचेविरुध्द विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे.

सुरगाणा येथील धान्य गोदामात झालेल्या अपहारामध्ये श्री.आर.डी.भोये, तत्कालीन गोदामपाल सुरगाणा, श्री. एच. जी. धूम, तत्कालीन पुरवठा निरीक्षक, सुरगाणा, श्री. आर. आय. तडवी, तत्कालीन तहसिलदार, सुरगाणा, श्री. वाय. एम. मंडलिक, तत्कालिन वाहतूक प्रतिनिधी, नाशिक रोड/अंबड, श्री. एस. एन. मंत्री, तत्कालिन वाहतूक ठेकेदार व त्यातील भागीदार हे सदर धान्य अपहारामध्ये प्रत्यक्ष सहभागी असून त्यांनी संगनमताने सदर धान्याचा अपहार केलेला आहे.

तहसिल कार्यालय, सुरगाणा येथील पुरवठा शाखेतील उपलेखापाल तसेच जिल्हा लेखा पर्यवेक्षक यांनी आपले शासकीय कर्तव्य पार पाडताना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास येते.

जिल्हा पुरवठा कार्यालय, नाशिक येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजाबाबत पर्यवेक्षीय हलगर्जीपण झाल्याचे निदर्शनास येते.

सदर प्रकरणात पोलिस विभागामार्फत दि.१२/०५/२०१५ रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, सुरगाणा (दिंडोरी कोर्ट) येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण २५९९ रास्त भाव दुकाने असुन त्यापैकी १२६२ रास्त भाव दुकानांना मे महिन्याचे नियतनानुसार धान्याचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत १३३७ दुकानांपैकी ६७१ रास्त भाव दुकानदारांचे प्रलंबित परमीटवरील धान्य जून २०१५ मध्ये वाटप करण्यात आलेले आहे. व ६६६ रास्त भाव दुकानदारांना धान्य वाटप प्रलंबित आहे. सदर धान्य वाटप प्रलंबित असलेल्या ६६६ रास्त भाव

दुकानदारांना प्राधान्यक्रमाने माहे जुलै, २०१५ या महिन्यात धान्य वाटप करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

सुरगाणा येथील शासकिय अन्नधान्य गोदामातील अपहार प्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये वाहतुक ठेकेदार मे.एस.एन.मंत्री यांचा समावेश असल्याने त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन त्यांनी वाहतुक कंत्राट करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याने त्यांचे वाहतुक कंत्राटास देण्यात आलेली मुदतवाढ दि. ६/२/२०१५ पासुन संपुष्टात आणलेली आहे. त्यामुळे अंबड व नाशिकरोड येथुन होणाऱ्या धान्याच्या वाहतुकीवर परिणाम झालेला आहे. सदर धान्य वाहतुक सुरळित करण्यासाठी मनमाड येथील वाहतुक ठेकेदार यांना तात्पुरत्या स्वरुपात वाहतुक ठेका जोडून देण्यात आला होता तथापि त्यांनी नकार दिल्याने दि.२७/४/२०१५ पासुन अंबड व नाशिकरोड येथून अधिग्रहीत वाहनांद्वारे वाहतुक सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राज्यात मॅगी नुडल्सच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत**

**(४९) * १६६५१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात बंद आवरणात विकल्या जाणा-या खाद्य पदार्थाची (उदा. मॅगी, शीतपेय, चिप्स) गुणवत्ता चाचणी केली जात नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशभरात मोनोसोडियम ग्लुटामेट (एमएसजी) आणि शिसे यांचे प्रमाण 'मॅगी नुडल्स' मध्ये अधिक असल्याचे आढळून आल्यानंतर राज्याच्या औषध प्रशासनाने (एफडीए) मुंबई, पुणे व नागपूर येथून मॅगीचे नमुने प्रयोग शाळेमध्ये तपासणीसाठी पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच, मॅगी नूडल्सचे नमुने सदोष आढळल्यामुळे मॅगीवर उत्तर प्रदेश, हरियाणा, केरळ राज्यामध्ये विक्रीवर बंदी घालण्यात आलेली असतांना मात्र राज्यामध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणात मॅगीची विक्री सुरू असल्याची बाब दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रयोगशाळेतील तपासणीचा अहवाल प्राप्त झाला नसल्याने तो येईपर्यंत नेस्ले कंपनीच्या मॅगी नुडल्स उत्पादनावर व वितरणावर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) प्रश्न भाग (१) मधील पदार्थांची गुणवत्ता चाचणी नियमित होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) देशभरात घेण्यात आलेल्या "मॅगी नुडल्स" मध्ये शिसे (Lead) चे प्रमाण मानदापेक्षा जास्त आढळून आल्याने तसेच मोनोसोडीयम ग्लुटोमेट (MSG) असल्याचे आढळून आल्यामुळे राज्यात प्रशासनाने मुंबई, पुणे व ठाणे येथून मॅगीचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविले होते.

(३) व (४) मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास संपूर्ण राज्यात "मॅगी" या अन्न पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले होते व अहवाल प्रलंबित होते. सदर अहवाल दि.५ व ६ जून रोजी प्राप्त झाले.

मॅगी नुडल्सच्या ०५ नमुन्यांमध्ये शिसे (Lead) चे प्रमाण मानदापेक्षा जास्त आढळून आल्यामुळे अन्न विश्लेषकाने सदर नमुने "असुरक्षित" घोषित केले तसेच सदर सर्व नमुन्यांमध्ये मोनोसोडीयम ग्लुटामेट (MSG) आढळून आल्याने "मिथ्या छाप" घोषित केले.

अन्न सुरक्षा प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दिनांक ०५ जून, २०१५ रोजी दिलेले आदेश तसेच मॅगी नुडल्सच्या अन्न नमुन्यांचे अहवाल लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०६ जून, २०१५ पासून राज्यातील जनतेच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने संपूर्ण राज्यात मॅगी नुडल्सच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्री यावर बंदीचे आदेश काढलेले आहेत.

(५) बंद आवरणात विकल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांचे नियमित नमूने घेण्यात येतात व त्यावरील अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम अंतर्गत अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येते.

----------------

**मौजे नांदगाव-चई (ता.कर्जत.जि.रायगड) तसेच राजापूर (जि. रत्नागिरी) येथील शाळेचे अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे झालेले नुकसान**

**(५०) * १९५९० श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मौजे नांदगाव-चई (ता.कर्जत, जि.रायगड) येथे माहे जानेवारी ते एप्रिल, २०१५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे तेथील शाळेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) झालेल्या चक्रीवादळामुळे तेथील ३३ शाळांची पडझड झाल्याचे माहे, मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय, असल्यास पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदरील शाळा वर्ग खोल्याची तातडीने दुरूस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे नांदगाव-चई (ता. कर्जत,जि. रायगड) येथील जि.प. शाळेची तलाठी यांच्यामार्फत पाहणी केली आहे. शाळांच्या सिमेंट पत्रे, लोखंडी पाईप, सिमेंट ढापे इ. बाबींचे नुकसान झाल्याचे दिसून आले. शाळा दुरुस्तीसाठीच्या सेस फंडातून शाळा दुरुस्तीची तजवीज ठेवली आहे. राजापूर, जि. रत्नागिरी येथील शाळांची गट गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत पाहणी केली आहे. ३३ शाळांची पडझड झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी २0 शाळांची दुरुस्ती झाली आहे. १३ शाळांची दुरुस्ती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## बीड जिल्ह्यात निर्माण झालेली पाणी टंचाई

**(५१) * १७१६७ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात व शहरामध्ये भीषण पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पाणी टंचाई दूर करण्याच्या अनुषंगाने बीड जिल्हयातील ५०५२ गावे/वाडयांसाठी टंचाई निवारणार्थ शासनाने विहित केलेल्या ९ उपाययोजनांपैकी एकूण ५७७० उपाययोजना समाविष्ठ असलेला टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यभरातील २५० बांधकाम व्यावसायिकांना वैध मापनशास्त्र विभागाने नोटीस पाठविल्याबाबत

**(५२) * २१७०५ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्राहकांना कमी क्षेत्रफळाचे घर देवून फसवणूक करणाऱ्या २५० बांधकाम व्यावसायिकांना वैध मापनशास्त्र विभागाने माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान नोटीस पाठविल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या बांधकाम व्यावसायिकांवर शासनाद्वारे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) ग्राहकांना कमी क्षेत्रफळाचे घर देवून फसवणूक करणा-या मुंबई व कोकण विभागातील एकूण १३ बांधकाम व्यावसायिकांनी कमी क्षेत्रफळाच्या सदनिका ग्राहकांना विकल्यामुळे वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार गुन्हे नोंदविण्यात आले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत करावयाच्या उपाययोजना**

**(५३) * १७४०७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चु कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात वैतरणा, तानसा, पिंजाळ, देहेर्जे, गारगावी या पाच नद्यांमध्ये मुबलक पाणी असताना पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यामुळे येथील १५ गावांतील ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे व पालघर जिल्ह्यातील ६४ गावांमध्ये माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली असून दातिवरे, कोरे, खर्डी, उसरणी (जि.पालघर) या सह परिसरातील अन्य गांवामध्ये गत अनेक वर्षे महिन्यातून केवळ १ ते २ वेळा पिण्याचे पाणी पुरवठा होत असल्याने स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बंदरपट्टी (ता. डहाणू) भागातील २६ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून या गावांकरिता नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामात करोडो रूपये खर्च करूनही सदरहू काम संथ गतीने सुरु असल्याचे व बाडापोखरण नळपाणी पुरवठा योजना बंद करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्हयातील पाणी टंचाई दूर करून नियमित पाणीपुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या  वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

वाडा तालुक्यात पिंजाळ, तानसा, वैतरणा, गारगावी अशा एकूण चार नद्या टँकरग्रस्त गाव/पाडयापासून साधारण सरासरी ७ ते ८ कि.मी. अंतरावर असल्याने व टंचाई काळात सदर नदयांची पात्रे कोरडी पडत असल्याने सदर गाव/पाडयांना पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे ठरत आहे.

वाडा तालुक्यातील ५ गावे व १५ वाडया असे एकूण २० गावे/ वाडया दिनांक १.०४.२०१५ ते दिनांक २२.०६.२०१५ पर्यंत टंचाई भासत असल्याने त्वरीत उपाययोजना म्हणून ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

सद्य: स्थितीत पुरेसा पाऊस झाल्याने टँकर बंद करण्यात आलेले आहेत.

(२) पालघर जिल्हयातील माहे एप्रिल ते जून २०१५ दरम्यान पाणीटंचाई असणाऱ्या १२४ गाव/पाडयांकरीता नवीन विंधण विहीरी घेण्याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

केळवा माहिम प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील एकूण १७ गावांना २ विभाग करुन एक दिवसाआड नियमितपणे पाणीपुरवठा केला जातो. दातिवरे, कोरे, खार्डी, उसरणी ही गावे या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत समाविष्ट आहेत. सदर भागासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजनेचे नुतनीकरण करण्याचे काम प्रस्तावित केलेले आहे.

महिन्यातून केवळ १ ते २ वेळा पिण्याचे पाणीपुरवठा होत असल्याने स्थानिक नागरीकांची गैरसोय होत असल्याची बाब खरी नाही.

(३) हे खरे नाही.

नवीन योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येत असून काम प्रगतीपथावर आहे. सदर योजना सप्टेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मे, २०१५ या कालावधीमध्ये बाडापोखरण नळ पाणी पुरवठा योजना बंद करण्यात आली नव्हती.

(४) पाणीटंचाई दूर करण्याच्या दृष्टीने टंचाई कार्यक्रमांतर्गत विंधण विहीरी घेणे, नळ पाणी पुरवठा योजनेची दुरुस्ती करणे ही कामे घेण्यात येत असून कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना व साधी विहीर योजनेची कामे घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील बिडवागळे धरणाच्या ओव्हर फ्लो बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५४) * २१३२४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातर्फे बांधण्यात आलेल्या बिडवागळे धरणाच्या ओव्हर फ्लो बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने पावसाळ्यात बांधकाम पूर्णपणे वाहून गेले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणाचे निकृष्ट काम करणारे ठेकेदार व संबंधित अधिकारी ह्यांची जिल्हाधिकारी, रायगड व मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांनी चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील शाळांना वेतनेतर अनुदान वितरीत करण्यासाठीचा निधी खर्च न झाल्याबाबत**

**(५५) * १९६५२ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अजय चौधरी (शिवडी),**

**ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) ठाणे जिल्ह्यातील शाळांना वेतनेतर अनुदान वितरीत करण्यासाठी शासनाकडून ठाणे जिल्हा परिषदेला ७ कोटी रुपयांच्या प्राप्त झालेल्या निधीचे वाटप एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही केले नसल्याने सदरील निधी खर्च न होता तसाच शिल्लक राहिला असल्याचे तसेच वेतनेत्तर अनुदान मंजूर असतानाही शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून अनेक माध्यमिक शाळांना अद्याप गेल्या वर्षीच्या अनुदानाचे वाटप झालेले नसल्याचे दि. ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी संबंधित शाळांना न मिळाल्याने त्या शाळांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागल्याने सदरहु निधी संबंधित शाळांच्या बँक खात्यावर तातडीने जमा करण्यात यावा अशी मागणी संबंधित शाळा प्रशासनाने जि.परिषद, ठाणे यांचेकडे नुकतीच केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत,

(४) उक्त प्रकरणी संबंधित दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरील निधी संबंधित शाळांना त्वरीत वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) सदर निधीचे शाळांना वाटप केव्हा पर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय.

(३) शाळांनी बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार १० मानके पूर्ण केलेली नाहीत. तसेच हमीपत्र/बंधपत्र दिलेले नाहीत त्या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यात आलेले नाही.

(४) व (५) निधीचे वाटप विहित मुदतीत न केल्याने संबंधित दोषी कर्मचा-यास निलंबित करण्यात आलेले आहे. ज्या शाळांनी त्रुटी पूर्ततेची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्या शाळांना कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. पात्र शाळांना वेतनेवर अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

-----------------

**कोकणात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(५६) * १८३७३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील महाविद्यालयांची संख्या लक्षात घेऊन कोकणात स्वतंत्र विद्यापीठ

स्थापन करणे गरजेचे असल्याने त्याबाबतची मागणी यापूर्वी विविध समाजसेवी संस्थांकडून, स्थानिक लोकप्रतिनिधीकडून निवेदनाद्वारे शासनाकडे सातत्याने करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध समित्यांच्या अहवालानुसार व सन २०११ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे २०० पेक्षा जास्त महाविद्यालये एका विद्यापीठांतर्गत येत असतील तर अशा विद्यापीठांचे विकेंद्रीकरण करता येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मुंबई, कोल्हापूर तसेच पुणे या विद्यापीठांवर अवलंबून रहावे लागत असल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकणात स्वतंत्र शैक्षणिक विद्यापीठाची उभारणी करण्याची मागणी विचारात घेता कोकणासाठी त्वरीत कोकण विद्यापीठ निर्मिती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) विद्यापीठांचे विभाजन करण्यासाठी डॉ.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(५७) * १९०३२ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात शासनाने करोडो रुपये खर्च करून राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजना बंद असल्याप्रकरणी व सदर योजनेत झालेल्या

गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त तालुक्यात चार मोठी धरणे आणि बारा लघु पाटबंधारे प्रकल्प असूनही व दोनशेहून अधिक पाणीपुरवठा योजनांवर करोडो रुपयांचा निधी खर्च होऊनसुध्दा डोळखांब, खर्डी, कसारा, किन्हवली, वासिंद, धसई या गांवाना अनेक आदिवासी गावे व पाड्यांना मार्च ते जूनपर्यंत दरवर्षी पाणी टंचाई जाणवते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील मागणीनुसार व प्रश्न भाग (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पाणी टंचाई कायमस्वरूपी दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे. शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील २३ गावे व ९० पाड्यांना मार्च ते जून, २०१५ या कालावधीत १६ टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. मात्र त्यात डोळखांब, खर्डी, कसारा, किन्हवली, वासिंद व धसई या गावांचा समावेश नाही.

(३) शहापूर तालुक्यात मागणी आधारीत पुरवठा या तत्वानुसार १८३ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या असून त्यापैकी १२९ नळ पाणी पुरवठा योजना व ५४ साधी विहीरीची कामे सुरु आहेत. सदरच्या योजना पूर्ण करण्यासाठी चौकशी करण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सुनावण्या घेतल्या असून पाठपुरावा सुरु आहे. पाणी टंचाई कायम स्वरुपी दूर करण्यासाठी टप्याटप्याने नळ पाणी पुरवठा योजना व प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात अत्यावश्यक वस्तुंच्या यादीत पॅकेज्ड दुधाचा समावेश करण्याबाबत

**(५८) * १६४०९ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण),**

**श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधासारख्या अत्यावश्यक पदार्थाची अधिकतम किरकोळ किंमती (MRP) पेक्षा जास्त दराने विक्री होत असतांनाही प्रचलित कायद्याप्रमाणे नाममात्र दंड आकारुन संबंधितांची सुटका होत असल्यामुळे दुधाचा अत्यावश्यक वस्तुंच्या यादीत समावेश करावा व सदर विभागाच्या निरिक्षकांचा “निर्देशित अधिकारी” या यादीत समावेश केल्यास कठोर कारवाई करता येईल असे वैद्यमापन शास्त्र विभागाच्या नियंत्रकांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाला प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई व ठाणे शहरामध्ये दूध पिशवी थंड करण्याच्या नावाखाली प्रत्येक दुकानदार लाखो ग्राहकांकडून एक ते दोन रुपये प्रत्येक दुधाच्या पिशवी मागे अतिरिक्त घेत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२)बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) एमआरपी पेक्षा जास्त दराने वस्तुंची विक्री करणा-या विक्रेत्यांविरुध्द वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते. नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य यांनी कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची कायदेशीर तपासणी करण्यात येत आहे.

-----------------

**बालचित्रवाणीच्या कर्मचा-यांना तब्बल १३ महिन्यापासूनचे वेतन अदयापही मिळाले नसल्याबाबत**

**(५९) * १९९६१ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यासाठी विविध कार्यक्रमांचे निर्मिती करणा-या बालचित्रवाणीच्या कर्मचा-यांना सुमारे १३ महिन्यापासूनचे वेतन अदयापही मिळाले नसल्याचे

माहे मे, २०१५ च्या दुस-या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच कारणावरुन यापूर्वीच अनेक कर्मचा-यांनी नोकरी सोडली असून बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने बालचित्रवाणीची स्थिती आणखी नाजुक बनली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून विविध शैक्षणिक कार्यक्रमाच्या निर्मितीसाठी बालचित्रवाणीला निधी मिळत असतानाही उक्त कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न शासनाने अद्यापपर्यंत न सोडविण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांचा वेतनाचा प्रश्न त्वरीत सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) वेतन न मिळण्याच्या कारणावरुन कर्मचा-यांनी नोकरी सोडलेली नाही. तथापि बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने तसेच स्वेच्छा निवृती घेतल्यामुळे सद्यस्थितीत केवळ १२० मंजूर पदांपैकी ४० कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) व (४) सदर संस्थेस केंद्रशासनाकडून सन २०१३-१४ आणि २०१४-१५ या वर्षाकरीता कोणतीही निधी प्राप्त झालेला नाही. सदर संस्था स्वायत्त असल्याने ती खाजगी सार्वजनिक सहभागाच्या तत्वावर सक्षमपणे उभी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यान्वये खाजगी शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील मुलांकरिता २५ टक्के आरक्षण बंधनकारक करण्याबाबत

**(६०) * १६४६८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह**

**पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यान्वये आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना २५ टक्के आरक्षणांतर्गत शाळांमध्ये मोफत प्रवेश देण्याचे धोरण शासनाने नव्याने जाहिर केले असून या आरक्षणांतर्गत खाजगी नामांकित शाळांमध्ये ही प्रवेश मिळणे शक्य होणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पहिलीच्या वर्गापासून प्रवेश देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आल्याने नर्सरी व केजी प्रवेश घेताना पालकांना अडचणी निर्माण होतील तसेच शाळांना शासनाकडून निधी दिला जात नसल्याने काही शाळा उक्त आदेशाची अंमलबजावणी करीत नसून त्यापैकीच नांदेड शहरातील काही नामांकीत इंग्रजी माध्यमाच्या शाळाही उक्त प्रवेशाबाबत अनुत्सुक असल्याचे सन २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राखीव कोटयामध्ये प्रवेश देणाऱ्या खाजगी शाळांना प्रत्येक विद्यार्थ्यापोटी दिले जाणारे शुल्क प्रतिपूर्तीचे सुमारे २६ कोटी रुपये देण्याचे शासनाने मान्य केले आहे. तथापि पुणे येथील राखीव कोट्यातील २५ टक्के प्रवेश प्रक्रियेची मुदत संपण्यास अवघे दोन दिवस असताना अनेक शाळांकडून अडवणूक सुरु असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने खाजगी शाळांना उक्त आरक्षण बंधनरकारक करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, तसेच २५ टक्के प्रवेश देण्यास अडवणूक करणा-या शाळांवर शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) प्रवेश न देणा-या काही शाळांना नोटीस देण्यात आल्या असून शाळांनी मा.उच्च न्यायालयात याचिक दाखल केलेली आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शाळेतील मुलांना देण्यात येणारा पोषण आहार वाटप बंद असल्याबाबत

**(६१) * १७२७९ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त व टंचाईग्रस्त भागातील शाळेतील मुलांना दिनांक १ मे , २०१५ पासून उन्हाळी सुट्टीतही शालेय पोषण आहार पुरविण्याचे शासनाचे आदेश असतानाही सोनाळा केंद्रातंर्गत ज्या ८ शाळांमध्ये खिचडी शिजते त्यामध्ये फक्त हळद व मीठ या साहित्याचांच वापर करण्यात येतो व तसा अहवाल दर आठवड्याला पंचायत समितीला पाठविला जातो परंतू उक्त शाळांना देण्यात येणारा पोषण आहार वाटप प्रत्यक्षात बंद असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) अमळनेर (जि.जळगांव) तालुका दुष्काळ जाहिर झाल्याने विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार सुट्टीतदेखील सुरु ठेवावा आणि एका शिक्षकाने तेथे उपस्थित राहावे असे शासनाचे सक्तीचे आदेश असतानाही उक्त जिल्ह्यातील दरेगाव, हिंगोणा, तासखेडा, अमोदा, मुडी-करणखेडे या ठिकाणी स्वयंपाकगृह बंद असल्याने उपरोक्त तालुक्यातील पाच जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये शालेय पोषण आहार शिजविण्यात आला नसल्यामुळे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे अनेक तक्रारी माहे मे, २०१५ मध्ये प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शाळेतील मुलांना आहार देण्याबाबतच्या आदेशाची अंमलबजावणी न करता शाळा बंद ठेवणा-या मुख्याधापकांची केंद्र प्रमुखांमार्फत चौकशी करुन कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश शिक्षणाधिका-यांनी अकोला जिल्ह्यातील सातही पंचायत समितीच्या गटविकास अधिका-यांना दिनांक २६ मे, २०१५ रोजी दिले तसेच शिक्षणाधिका-यांनी दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी सुट्टीतही खिचडी वाटप करण्याचे निर्देश सर्वांना दिले असतानाही दिनांक २५ मे, २०१५ रोजी केलेल्या पाहणीत अकोला जिल्ह्यातील १७५ शाळांच्या खिचडीचे वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षणाधिका-यांनी खिचडी वाटप करण्याचा आदेश असतानाही जाणीवपूर्वक योजना बंद ठेवणा-या शिक्षणसंस्थाकडे विभागाने दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील योजना बंद ठेवणा-या शाळांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक २१/0५/२0१५ रोजी सदर शाळांमध्ये शालेय पोषण आहार बंद होता अशा स्वरुपाचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(३) वृत्तपत्रात अशा स्वरुपाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(४) व (५) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दुष्काळग्रस्त भागात उन्हाळयाच्या सुटीमध्ये विदयार्थ्यांना शालेय पोषण आहार देणे बंधनकारक आहे. यानुसार अशा स्वरुपाचा सुचना दरवर्षी शिक्षण संचालनालयामार्फत क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात येतात. यानुसार उन्हाळयाच्या सुटीत जे विदयार्थी शाळेत उपस्थित राहतील त्यांना पोषण आहार देण्यात येतो,तथापि, या कालावधीत उपस्थितीचे प्रमाण खूपच कमी असते.

अमळनेर तालुक्यातील दरेगाव, हिंगोणा, तासखेडा, अमोदा या ठिकाणी सुट्टीच्या कालावधीत उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजवून देण्यात आलेला आहे. मुडी-करणखेडे येथे दि. २१/0५/२0१५ रोजी गावांत कार्यक्रम असल्याने विदयार्थी उपस्थित नसल्यामुळे आहार शिजवण्यात आला नाही. मात्र शिक्षक शाळेवर उपस्थित हाते.

अकोला जिल्हयांमध्ये सुट्टीच्या कालावधीत शाळेत उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजवून देण्यात आलेला आहे. तथापि, काही शाळांमध्ये विदयार्थी उपस्थित नसल्याने संबंधित शाळांमध्ये शालेय पोषण आहार शिजविण्यात आलेला नाही. तथापि, सदर शाळेत शिक्षकांची उपस्थिती होती.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीकडून खंडाचे पुर्नमुद्रण बंद झाल्याबाबत

**(६२) * १८२२६ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीकडून सन २००६ पासून नवीन साहित्याचा एकही खंड प्रकाशित झाला नसून खंडाचे पुर्नमुद्रणही बंद झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मिठी नदी दूषित करणा-या अनधिकृत**
**कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(६३) * २२५४० श्री.योगेश सागर (चारकोप) :**

**तारांकित प्रश्न क्रमांक १५००० ला दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीच्या आसपास असलेल्या सुमारे १०० बेकायदा कारखान्यांचे दुषित पाणी मिठी नदीच्या पात्रात सोडले जाते, त्यामुळे मिठी नदी प्रदुषित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदी दूषित करणा-या अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करुन कारखान्यांचे वीज व पाणी खंडित करण्याचा इशारा मा.पर्यावरण मंत्री यांनी दिनांक १५ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे. टेक्नोग्रीन एन्व्हायरो, पुणे या संस्थेमार्फत मिठी नदीचे तिच्या उगमापासून, समुद्रखाडीच्या संगमापर्यंत केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार मिठी नदीत मिसळत असलेल्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेकडे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मिठी नदीकाठी संरक्षक भिंतीचे बांधकाम पूर्ण करणे, औद्योगिक तसेच घरगुती सांडपाणी मिठी नदीत मिसळण्यास प्रतिबंध करणे, मिठी नदीतील गाळ काढणे तसेच घनकच-याचे व्यवस्थापन करणे इत्यादी बाबत संबंधितांस देण्यात आलेल्या आदेशाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच मिठी नदीचे प्रदुषण करणा-या किती अनधिकृत कारखान्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमलेल्या स्वतंत्र तज्ञ सल्लागारा मार्फत मिठी नदीच्या विविध ठिकाणच्या पाण्याचे नमुने गोळा करुन त्याचे पृथ:क्करण करण्यात आले. या पृथ:क्करण अहवालानुसार मिठी नदीत ९३ टक्के घरगुती सांडपाणी व ७ टक्के औद्योगिक सांडपाणी मिसळत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मिठी नदीची एकूण लांबी १७.८४ कि.मी. असून १२.६०८ कि.मी. लांबीच्या संरक्षण भितींचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ६.३५ कि.मी लांबीचे काम शिल्लक आहे.

मिठी नदीत मिसळणाऱ्या सांडपाण्याला व इतर कारणांनी होणाऱ्या प्रदुषणास आळा घालण्याकरीता उपाययोजना सूचविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेमार्फत भारतीय प्राद्योगिकी संस्था, मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे. तसेच मिठी नदीत मिसळणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेकडे विचाराधीन आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम पूर्ण झाले असून मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम टप्पा-१ अंतर्गत एप्रिल, २००६ ते जून, २००६ या कालावधीत हाती घेण्यात आले होते. सदर काम पूर्ण करण्यात आले आहे.

मिठी नदी प्रदूषणाबाबत मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४ मे, २०१५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये मिठी नदीकाठावरील उर्वरित सहा किलोमीटर परिसरातील झोपड्या/दुकाने यांची पात्रता निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, सदर कार्यवाही विरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मिठी नदीच्या प्रदुषणास जबाबदार असलेल्या ९७ कारखान्यांवर उत्पादन बंद करण्याचे आदेश बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माथेरान (जि.रायगड) येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुधारित व वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अपूर्ण असल्याबाबत**

**(६४) * २०९७१ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत**

**तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित व वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याची अंतिम तारीख दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ असताना सदर कामाची मुदत संपून दोन वर्षे उलटूनही योजना अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस सदर पाणीपुरवठा योजना पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, त्यामुळे तेथील नागरीकांना तसेच हॉटेल व्यावसायिकांना दोन दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेथील नागरीकांना नियमित पाणीपुरवठा होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) माथेरान येथील सुधारीत व वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम माथेरान येथील (१) विशिष्ट भौगोलिक रचना, (२) मोठ्या प्रमाणावरील पर्यटकामुळे शहरातील वितरण व्यवस्थेतील कामे करण्यात आलेल्या अडचणी, (३) मॉनिटरींग कमिटी, रेल्वे क्रॉसिंग, दळी प्लॉटधारक व स्थानिक संस्थांकडून पाठपुरावा करुनही परवानगी मिळण्यास झालेला विलंब व (४) पर्यटन विभागाकडून निधी मिळण्यास झालेला विलंब इत्यादी कारणामुळे अपूर्ण आहे.

(३) व (४) अंशतः खरे आहे. सदर योजनेतील उपांगे कार्यान्वित करुन नागरीकाना नियमित पाणी पुरवठा करण्यात येत आहे. उन्हाळ्यात पर्यटकांचा हंगाम विचारात घेऊन काही काळापुरते एक दिवसआड पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गुटखा बंदी करण्याबाबत

**(६५) * १६५४४ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण),**

**श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :**

**तारांकित प्रश्न क्रमांक १४४२८ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने गुटखा बंदी लागू केली असतानाही सार्वजनिक ठिकाणी गुटखा,तंबाखू, मावा व अन्य अंमली पदार्थ मुंबईतील हॉस्पिटलांमध्ये, चहा टपरीवर, पानपट्टीवर ठिकठिकाणी तसेच सांगली जिल्ह्यातील मिरज शहर आणि इतर ग्रामीण भागांमध्ये अनेक टप-यांवर तसेच उस्मानाबाद,लातूर,कोल्हापूर तसेच जळगाव जिल्ह्यातील जळगांव शहर आणि इतर ग्रामीण भागांमध्ये चहाची टपरी, कोल्ड्रिंक हाऊस आदि ठिकाणी व मेहकर (जि.बुलढाणा) येथे मोठ्या प्रमाणावर अवैध गुटखा विक्री चालू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, करमाळा (जि.सोलापूर) येथील अवैध गुटखा विक्रीची माहिती मिळाल्यावर एमआयडीसीमध्ये छापा टाकण्यास गेलेल्या अन्न व औषध प्रशासन अधिका-यांच्या अंगावर टेम्पो घालण्याचा प्रयत्न माहे मे,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान झाला, हे खरे आहे काय,

(३) तसेच अंधेरी (मुंबई) येथील बद्रु कंपाउंड, यादव नगर, खेरानी रोड, साकीनाका येथे धाड टाकून अन्न व औषध प्रशासनाने रुपये २६ लाख ५६ हजाराचा गुटखा, पानमसाला, तंबाखू इ.अनधिकृत साठा जप्त केला व सदर प्रकरणी मनिष पटेल याच्या विरोधात साकीनाका पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे दि.३० मे,२०१५ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, रोहा (जि.रायगड) तालुक्यात ठिकठिकाणी छुप्या पध्दतीने गुटखा विक्री होत असून जिल्हा गुन्हा अन्वेषण विभागाने रोहा पोलिस स्टेशननजिक महात्मा फुले नगरमधील बिल्डींगच्या तळमजल्यातील गाळयामध्ये बेकायदेशीर लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) राज्यात गुटखा निर्मितीचे लहान कारखाने सुरु असून पुणे विभागात एका महिन्यात गुटखा निर्मिती करणारे दोन कारखाने सापडले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच ,राज्यात गुटखा बंदी लागू असतानाही अन्य राज्यातून अवैधरित्या गुटखा आयात केला जात असल्याने त्यावर अन्न व औषध प्रशासन कारवाई करणार आहे काय,

(७) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने गुटखा विक्रीवर बंदी आणण्याकरिता अन्न सुरक्षा कायद्यातंर्गत कलम ३२८ चा वापर करण्याबाबत कायदेशीर सल्ला घेण्यात आला आहे काय, त्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

(अ) मुंबईतील हॉस्पिटलांमध्ये चहा टपरीवर व पानपट्टीवर छुप्या पध्दतीने प्रतिबंधित गुटखा, पानमसाला इत्यादींची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले असून, दि. २०/७/२०१४ ते ३१/५/२०१५ या कालावधीत ४१ ठिकाणी धाडी टाकून रु.९६,९६,४५२/- किमंतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(ब) सांगली जिल्ह्यातील मिरज शहर आणि इतर ग्रामीण भागांमध्ये टपऱ्यांवर छुप्या पध्दतीने प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित सुपारी, सुगंधित तंबाखू इत्यादींची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले असून माहे, जुलै, २०१४ ते मे, २०१५ या कालावधीत मिरज शहरात ०८ ठिकाणी धाडी टाकून रु.८,७१,३६६/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असून, संबंधितांविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(क) उस्मानाबाद जिल्ह्यात माहे २० जुलै, २०१४ ते २५ जून, २०१५ या कालावधीत एकूण १५ ठिकाणी धाडी टाकून रु. ६५,१३,२५१/- किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला असून, संबंधितांविरुध्द ०८ खटले दाखल करण्यात आले आहेत.

(ड) लातूर जिल्ह्यात माहे जुलै, २०१४ ते २५ जून, २०१५ या कालावधीत एकूण ३३ ठिकाणी धाडी टाकून रु. ६४,३५,२६३/- किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला असून, संबंधितांविरुध्द २८ खटले दाखल करण्यात आले आहेत.

(इ) कोल्हापूर जिल्ह्यात माहे जुलै, २०१४ ते जून, २०१५ या कालावधीत एकूण ७५ ठिकाणी धाडी टाकून रु.१,५८,६२,८४८/- किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(ई) नाशिक विभागाअंतर्गत जळगाव कार्यालयाने जळगाव शहर व इतर ग्रामीण भागात १० ठिकाणी टाकलेल्या धाडीत एकूण रु. २०,४५,४४०/- किमतीचा साठा जप्त केला आहे.

(उ) बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यामध्ये तुरळक प्रमाणात छुप्या पध्दतीने गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मेहकर तालुक्यात दि. २०/०७/२०१४ ते २५/०६/२०१५ या कालावधीत १२ ठिकाणी रु. ३,८६,५३०/- एवढ्या किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

छापा टाकण्यास गेलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या अंगावर टेम्पो घालण्याचा प्रयत्न करणारा टेम्पोचालक टेम्पोसह पळून गेल्याने संबंधितांविरुध्द करमाळा, जि.सोलापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर ठिकाणी धाड टाकून विविध प्रकारचे गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू या प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण रु.२६,५६,०००/- किमतीचा साठा जप्त करुन ताब्यात घेण्यात आला असून, संबंधितांविरुध्द प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहे.

(४) होय, हे खरे आहे. जिल्हा अन्वेषण विभाग, रायगड यांनी दिनांक ०७/०४/२०१५ रोजी मे. अलसबा पान शॉप, मु.शिळफाटा, पटेल नगर, खोपोली ता.खालापूर, जि.रायगड येथून प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला होता त्या अनुषंगाने पुढे चौकशी व तपास केला असता, खालचा मोहल्ला, धाविर मंदिर रोड, आशियाना अपार्टमेंटमधील तळमजल्यावरील गुटखा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे अन्न

पदार्थ सुपारी तुकडी, तंबाखू, कात पावडर, मॅग्नेशिअम कार्बोनेट, लाईम पावडर, लवंग पावडर तसेच तयार गुटखा असा एकूण रु.११,०५,४००/- किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

(५) होय, हे खरे आहे.

पुणे विभागात अवैध गुटखा निर्मिती करणारे ०२ कारखाने सापडले असून, चिंचोळी, ता.बार्शी, जि.सोलापूर येथून प्रतिबंधित गुटखा, सुगंधित सुपारी व इतर साहित्यासह रु.१९,८३,६००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन पोलीस स्टेशन पांगरी येथे फिर्याद दाखल केली आहे. तसेच ता.भोर, जि.पुणे येथून प्रतिबंधित साठा व इतर साहित्यासह रु.३,३१,५००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करुन राजगड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे.

(६) (अ) सीमावर्ती भागातून येणारा गुटखा रोखण्याकरीता विविध चेकनाका, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी पाळत ठेवून कारवाई करण्यात येत आहे. यासाठी पोलीसांचे सहाकार्य घेण्यात येत आहे.

(ब) परराज्यातून येणाऱ्या लक्झरी बसेसची स्थानके यांच्यावर पाळत ठेवून गुटखा व तत्सम अन्न पदार्थ जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

(७) अन्न व औषध प्रशासनाचा कलम ३२८ च्या वापराबाबत च्या अनुषंगाने कायदेशीर सल्ला घेण्यासाठी अन्न सुरक्षा आयुक्त यांनी प्रतिबंधित अन्न पदार्थाच्या प्रकरणी कलम ३२८ लावण्याबद्दल राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांना त्यांच्या अधिपत्याखालील पोलिस ठाण्यात सूचित करण्याबाबत शासनास विनंती केली असून त्यानुसार कायद्याच्या तरतूदी तपासून भा.दं.वि. कलम ३२८ सदर प्रकरणी लागू करता येईल किंवा कसे याबाबत प्रस्ताव गृह विभागास सादर करण्यात आला आहे.

-----------------

## तळवडे (पुणे) येथील सरस्वती विश्व विद्यालयाच्या प्रशासनाने अकारावीच्या विद्यार्थ्यांना बनावट निकालपत्रे दिल्याबाबत

**(६६) * १७६५३ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवडे (पुणे) येथील सरस्वती विश्व विद्यालयाच्या प्रशासनाने अकारावीच्या विद्यार्थ्यांना बनावट निकालपत्रे दिली असुन या निकालपत्रावर पास किंवा नापास हा शेरा नाही तसेच त्यावर विद्यालयाच्या प्राचार्याची सही किंवा शिक्काही नसल्यामुळे विद्यार्थ्यांची फसवणुक झाल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) सरस्वती विश्व विद्यालय, तळवडे रोड, पुणे शाळेच्या प्रशासनाने इ. ११ वीच्या विद्यार्थ्यांना बनावट निकालपत्रे दिली ही बाब खरी नाही. सदर शाळा पूर्णतः इंग्रजी माध्यमाची असल्याने निकालपत्रांवर पास किवा नापास असा शेरा नसून सवलतीचे गुण घेऊन उर्तीण झालेल्या विद्यार्थ्यांच्या निकालपत्रावर promoted with grace marks, सवलतीच्या गुणांशिवाय केवळ गुणवत्तेवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या निकालपत्रकावर promoted व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या निकालपत्रकावर Detained असा शेरा देण्यात आला आहे. निकालपत्रावर वर्गशिक्षक व मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी आहे. परंतू शाळेचा/संस्थेचा शिक्का उमटविलेला नाही.

निकालपत्रकाची तपासणी केली असता निकालपत्रक गोषवारा व विद्यार्थ्यांना दिलेले निकालपत्रक यामध्ये तफावत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची फसवणूक झाली असे म्हणता येणार नाही.

उच्च माध्यमिक शाळेचे तसेच विद्यार्थ्यांच्या, संस्थेच्या व शिक्षकांच्या संबंधित सर्व अभिलेख नियमाप्रमाणे विहित प्रपत्रात अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना दिल्या असून सदर निकालपत्रासंदर्भातील त्रृटींबाबत संबंधितांकडून खुलासा घेऊन याप्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बालभारतीच्या पाचवीच्या पुस्तकातील तसेच केंद्र शासनाच्या एनसीईआरटीच्या १० वी व १२ वीच्या पाठयपुस्तकातील चुकांबाबत**

**(६७) * १६५७६ श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालभारतीने यंदा नव्याने छापण्यात आलेल्या पाचवीच्या परिसर अभ्यास-२ च्या आपण कसे घडलो या पुस्तकात छापण्यात आलेल्या नकाशात नद्यांच्या

स्थानांची अदलाबदल करुन त्या वळविण्यात आल्या असल्याचे माहे मे-२०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच बालभारतीने पुस्तके छापताना दरवर्षीप्रमाणे सध्याच्या वर्षी पुस्तके छापताना राष्ट्रगीतात अनेक चुका, मंबईच्या नकाशात ७ ऐवजी १० बेटं, दोन नद्यांची दिशाच बदलली यांसारख्या अनेक अक्षम्य चुका केल्याचे निदर्शनास आणले असता या चुकांबाबत 'बालभारती' चे संचालक चिंतामणी बोरकर यांनी शासनाकडून जे राष्ट्रगीत येतं तेच आम्ही छापत असल्याचं प्रसार माध्यमांना सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच केंद्र शासनाच्या एनसीईआरटी या मंडळाच्या माध्यमातून इयत्ता ७ वी, १० वी आणि १२ वी च्या पाठपुस्तकामध्ये भारतीय संस्कृतीविषयी खोटी, अवमानकारक माहिती देणारा, तसेच विशेषतः ७ वीच्या पुस्तकामध्ये अवघ्या पाच ओळीमध्ये शिवरायांचा इतिहास मांडला गेल्याने महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना छत्रपती शिवरायांच्या इतिहासापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे हा इतिहास बदलण्याची मागणी मा. पर्यावरणमंत्री यांनी दिनाक १८ डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्र्यांकडे केली असून यासंदर्भात दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी हिंदू जनजागृती समितीनेही मुंबईतील आझाद मैदान येथे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असताना संतप्त भरणे आंदोलन करुन याविषयी मा.मुख्यमंत्र्याना दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, उक्त प्रकरणी शैक्षणिक पुस्तकांच्या चुकांबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन चुका करणा-यांवर कोणती कारवाई केली तसेच या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) "युफ्रेटिस" व "टायग्रीस" या नद्यांच्या नावांत अदलाबदल झाली आहे. तथापि, सदर बाब सर्व शाळांना कळवून यानुसार बदल करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडून प्राप्त माहितीनुसार पाठ्यपुस्तकांमध्ये राष्ट्रगीत छापण्यात आले आहे. राष्ट्रगीताची सदर बाब मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

पूर्वीच्या मुंबईच्या नकाशामध्ये मुंबईची ७ बेटे दाखवून त्याबाबतची माहिती पाठ्यपुस्तकात दिलेली आहे. तथापि, याला लागून असणारी ३ बेटे ही नकाशात दाखविली आहेत. सदर बेटे काढून टाकणे नकाशाशास्त्रीय दृष्ट्या चुकीचे आहे.

(३) व (४) एनसीईआरटी हे केंद्र शासनाच्या अखात्यारीत येत असल्याने एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकाबाबत प्राप्त तक्रार अर्ज संचालक, एनसीईआरटी, नवी दिल्ली यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील सुमारे ५० हून अधिक शिक्षकांच्या नोक-या धोक्यात आल्याबाबत

**(६८) * २३२०९ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील शिक्षक पदांना बेकायदेशीर मान्यता दिल्यामुळे सुमारे ५० हून अधिक शिक्षकांच्या नोक-या धोक्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली येथील उपशिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या पदाच्या कार्यकालात (दिनांक १ जून ते १३ ऑक्टोबर, २०१०) बेकायदेशीर शिक्षक मान्यता देणे यासारखे अनेक गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन उपशिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी आदींनी पदाला मान्यता देण्यापूर्वी अनेक कायदेशीर बाबी न तपासताच सुमारे १५० पदांना मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. सदर प्रकरणी १५० हून अधिक शिक्षकांना मान्यता देण्याबाबत अनियमितता झाली असल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) सांगली जिल्हयातील शिक्षक पद मान्यतेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी यांना निलंबित करण्यात आलेले आहे व त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर

प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. सदर चौकशी अहवालानुसार काही मान्यतेबाबत त्रुटी आढळून आल्या आहेत व याबाबत शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ च्या (क) नुसार पुढील कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नवीन शाळा सुरु करण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारशीबाबत

**(६९) * १८०५३ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शाळा, तुकड्या सुरु करणे, मंजूर करणे आदीच्या निकषांसाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्या समितीने इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरु ठेवण्यासाठी विद्यार्थी संख्येची मर्यादा ४० निश्चित केली असून त्यासाठी दोन शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी तर विद्यार्थी संख्या ४१ ते ८० झाली तर तीन शिक्षक व एक मुख्यध्यापक नेमण्याची शिफारस केली असून ४० पेक्षा विद्यार्थी संख्या कमी असेल तर थेट माध्यमिक विभागच बंद करण्याची शिफारस प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी दिनांक १० एप्रिल, २०१४ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने महत्वाच्या इतर कोणत्या शिफारशी अहवालात केल्या त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त शिफारशीमुळे राज्यातील शेकडो माध्यमिक शाळा बंद होणार असून त्या शाळेतील विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित राहणार असून शिक्षक बेकार होणार असून माध्यमिक शिक्षण ग्रामीण विद्यार्थ्यांना अधिक खडतर होईल याबाबत महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक मंडळाच्या प्रवक्त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने तसेच शिक्षक व लोकप्रतिनिधींनी सादर केलेल्या दुरुस्ती संदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५ ) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) बालकांचा मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे, अतिरिक्त शिक्षकाचे/पर्यवेक्षकाचे/मुख्याध्यापकाचे पद मंजूर करणे/कमी करणे, कमीत कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नजिकच्या शाळेत समायोजन करणे, शुन्य विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेतील शिक्षकांची पर्यायी व्यवस्था आणि त्यानुषंगाने शाळांमध्ये संरचात्मक बदल करण्याबाबत पर्याय सुचविण्यात आले आहेत.

(३) होय, हे खरे आहे परंतू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात नाही.

(४) प्रधान सचिव (शा.शि) यांच्या समितीने शासनास सादर केलेला अहवाल विभागाच्या संकेतस्थळावर जनतेच्या अवलोकनार्थ व अभिप्रायार्थ प्रसारित करण्यात आला होता. त्यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. राज्यातील विविध संघटना, संस्था, नागरिक, लोकप्रतिनिधी यांच्याकडून हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. बहुवर्ग बहुस्तर अध्यापन पध्दती, विद्यार्थ्यांचे समाजिकरण, विद्यार्थ्यांचे समायोजन, अतिरिक्त शिक्षकांचे/मुख्याध्यापकाचे पद निर्माण करणे, नवीन शाळा सुरु करणे आणि शाळांमध्ये संरचनात्मक बदलांबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे व सातारा जिल्ह्यामध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत

**(७०) * १८१६२ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर (जि.पुणे) तालुक्यांमध्ये पाण्याची पातळी माहे मार्च पासून झपाट्याने कमी होत असल्याने तेथील नागरिकांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करावा अशी मागणी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वाई व माण, खटाव, कोरेगाव, फलटण (जि.सातारा) या तालुक्यात मार्चपासून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने टँकरद्वारे पाणी पुरविण्यात यावे अशी मागणी तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत व माहे मे अखेरीस संभाव्य पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आतापर्यंत किती तालुक्यांना/गावांना टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

बारामती, पुरंदर व आंबेगाव या तालुक्यांमधून टँकरची मागणी प्राप्त होती. तथापि, जुन्नर तालुक्याकडून टँकर्सची मागणी प्राप्त झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आवश्यकतेनुसार उपाययोजना घेण्यात येत आहेत.

पुणे जिल्ह्यातील बारामती, पुरंदर व आंबेगाव या तालुक्यांत मे, २०१५ अखेरपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तथापि जुन्नर तालुक्याकडून टँकरची मागणी नसल्याने मे, २०१५ अखेरपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही.

माहे एप्रिल, २०१५ वा त्या दरम्यान प्राप्त मागणीप्रमाणे वाई, माण, खटाव, कोरेगाव, फलटण येथे टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच संभाव्य पाणी टंचाईचा तातडीने आढावा घेवून ३१ विंधन विहिरी अधिग्रहण आणि ४२ नविन विंधन विहिरांनी प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही केली आहे.

(४) पुणे जिल्ह्यामध्ये आतापर्यंत १० तालुक्यामधील एकूण ४१ गावे व २६६ वाड्यांना ४७ टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये ९ तालुक्यांपैकी ५९ गावे आणि १८८ वाड्यांना एकूण ५७ टँकरद्वारे १३१ खेपा करुन पाणी पुरवठा करणेत आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वृध्दींगत करण्याबाबत

**(७१) * २००३६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मराठी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वृध्दींगत करण्याच्या हेतूने तत्कालीन शासनाने दिनांक ३ मार्च, २०१४ रोजी स्वातंत्र पूर्व काळातील ९० मराठी, १० उर्दू, हिंदी आणि गुजराती शिक्षण संस्थांना २० कोटीची विशेष आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला असून यापैकी प्रत्येक शाळेला १० लाख रुपये देण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या सदरहू निर्णयानुसार स्वातंत्र पूर्व काळातील १०० शाळांना देण्यात येणा-या विशेष आर्थिक अनुदान निधी अद्याप उपलब्ध झालेले नसल्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, मुंबईतील घाटकोपर येथील एकेकाळी २६ तुकड्या असलेल्या सर्वोदय मराठी शाळेत आता केवळ २५ विद्यार्थीच असून विद्यार्थीच नसल्याने शिक्षकांची

संख्याही १३० वरुन २ वर आली असल्याने मुंबईतील गरीब विद्यार्थ्यांसाठी असलेल्या खासगी अनुदानीत शिक्षणाचा एक मोठा स्त्रोत आता कायमचा बंद होण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार बिकट परिस्थितीत असलेल्या खासगी अनुदानीत मराठी शाळांसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त विशेष आर्थिक अनुदानाचा निधी संबंधित शाळाना त्वरीत वितरीत होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) स्वतंत्र पूर्व काळातील १०० शाळांना निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) सदर शाळेत इयत्ता ८ वी ते १० वी चे एकूण ६९ विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळेत १ मुख्याध्यापक व २ शिक्षकांची पदे मंजूर आहेत.
(४) होय, सध्या पालकांचा मराठी माध्यमांऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे कल वाढत असल्याने मराठी शाळांची पट संख्या कमी होत आहे. मराठी माध्यमांचे विद्यार्थी टिकून राहावे यासाठी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटप तसेच सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विशेष अर्थिक अनुदानासंदर्भात निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई, ठाणे, सातारा, सांगली तसेच नांदेड**
**जिल्ह्यात होत असलेली दूध भेसळ**

**(७२) * १७११७ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यात पौष्टीक व प्रथिने असलेल्या दूधामध्ये अशुध्द पाणी टाकून

विक्री होत असल्याचे तसेच दुधात भेसळ करतांना युरियाचा वापर करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये  वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी दूध भेसळीविरोधात मुंबई, ठाणे, सातारा, सांगली जिल्हयात छापे टाकून विशेषतः मुंबईत ९३५ लिटर दुधाचा साठा जप्त केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भेसळ दूधाच्या नमुन्यांचे प्रयोगशाळेत विश्लेषण करण्यात आले असून त्यात काय आढळून आले , त्यानुसार दुधात भेसळ करणाऱ्या टोळींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दुध भेसळी विरोधात ठाणे, सातारा, सांगली जिल्हयात विशेष मोहिम राबविली आहे. तसेच मुंबईत मे, २००५ च्या सुमारास ९३१.५ लिटर दुधाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(३) मुंबई विभागाने या मोहिमे दरम्यान दुधाचे ०३ ठिकाणाहून एकूण १० नमुने तपासले त्यापैकी ०७ नमुने घेताना दुधात प्रतिबंधित पाण्याची भेसळ करताना रंगेहाथ पकडल्याने ०२ ठिकाणी संबधितांविरुध्द एफआयआर दाखल करण्यात आला असून, उर्वरित ठिकाणी तपासणीस घेतलेल्या दुधाच्या ०३ ही नमुन्यात स्टार्चची भेसळ आली आहे. वरील सर्व ठिकाणी तपासानंतर न्यायालयात खटले दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

सातारा जिल्हयात २० दुधाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते त्यापैकी ०५ नमुने कमी दर्जाचे घोषित करण्यात आले व १५ नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले. कमी दर्जाच्या नमुन्यांच्या संदर्भात न्यायनिर्णय कारवाई घेण्यात येत आहे.

ठाणे विभागातील १२ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले, हे सर्व नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

सांगली जिल्हयातील तपासणीसाठी घेण्यात आलेले दुध व दुग्धजन्य पदार्थांचे सर्व ३० नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर व यवतमाळ येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय तथा रुग्णालयातील त्रुटींबाबत**

**(७३) * २११३३ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय तथा रुग्णालय येथील ६३ वर्षे जुन्या असलेल्या विद्युत यंत्रणामुळे विद्युत दाब खंडीत झाल्याने रुग्णालयातील महागडी उपकरणे निकामी होत असुन महत्त्वाच्या शस्त्रक्रिया थांबविण्यात येतात तसेच यापूर्वी विद्युत दाब खंडीत झाल्याने रेडियोलॉजी विभागातील एम.आर.आय व डिजिटल एक्सरे मशिनचे नुकसान झाले होते, तथापि सदरील रुग्णालयाच्या विद्युतीकरण व नवीनीकरण यासाठी सन २०१० मध्ये १,८०,९४,४५२ रुपयांच्या कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे परंतु अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालया मधील एक्स-रे व एम.आर.आय. मशीनच्या देखभालीकरीता कंपनीला शासनाकडून निश्चित दिला जाणारा दिड कोटी रुपयांचा निधी अद्याप न मिळाल्याने मागील दोन महिन्यांपासून सदरील मशीन बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे , हे ही खरे आहे काय, तसेच सदरील निधीन देण्याची कारणे काय आहेत,

(३) मुंबई येथील जे.जे. व पुणे येथील ससून रुग्णालयात रेटीना (डोळ्याच्या पडद्याची) शस्त्रक्रिया होतात तथापी अशा शस्त्रक्रिया नागपूर शहरातील मेयो रुग्णालय व वैद्यकिय रुग्णालयात होत नाही तसेच मेयो रुग्णालयासह यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालय उक्त शस्त्रक्रिया नागपूरच्या येथे डायलेसिस यंत्रणा असतानाही गत दोन वर्षापासून त्याचा लाभ किडणीच्या रुग्णांना देण्यात आलेला नसल्याने अनेक रुग्णांचा उपचाराविना मृत्यू होत असल्याचे दि. १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रश्नांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) विद्युत दाब खंडित झाल्याने निर्माण झालेल्या तांत्रिक खंड तातडीने दुरुस्त करुन तसेच दैनंदिन शस्त्रक्रियेच्या वेळापत्रकात अंशतः बदल करुन त्या सुरळीत करण्याची व्यवस्था प्रशासनामार्फत करण्यात येते.

रुग्णालयाच्या विद्युतीकरण व नविनीकरण प्रस्तावास शासनाने सन २०१४ मध्य रु.१,६२,३४,०००/- इतका निधी वितरीत केला असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) सद्यःस्थितीत रुग्णालयात एक डिजीटल एक्स-रे मशिन बंद असून उर्वरित मशिन सुस्थितीत कार्यरत आहेत. देखभालीच्या खर्चाचे देयक देण्याची व मशिन दुरुस्ती करुन कार्यान्वित करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सरकलेले रेटीना (डिटॅचमेंट ऑफ रेटीना) वगळता डोळ्यांच्या इतर सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील बंद असलेली डायलिसिस यंत्रणा कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु असून सद्यःस्थितीत डायलिसिस उपचाराकरिता रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे दाखल करण्यात येते.

श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील डायलिसिस यंत्रणा नादुरुस्तीमुळे काही कालावधी करिता बंद होती, सदर यंत्रणा दि. १८/४/२०१५ पासून दुरुस्तीनंतर सुरु करण्यात आलेली आहे, दरम्यानच्या कालावधीत या रुग्णालयातील रुग्णांना उपचारार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे पाठविण्यात येत होते. उपचाराअभावी कोणत्याही रुणाचा मृत्यू झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कामेरी, (ता. वाळवा, जि.सांगली) येथील भारत निर्माण योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(७४) * २४९४७ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामेरी (ता. वाळवा, जि.सांगली) येथील भारत निर्माण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी २३ लक्ष रुपये योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे सदर गावास पिण्याच्या पाण्याचे अद्यापही दुर्भिक्ष्य भासत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अभियंता, जि.प., सांगली यांच्याकडे लेखी स्वरुपात निवेदने देवून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी ,शिराळा यांनी मा. पाणीपुरवठा मंत्री महोदयांना निवेदन दिल्यानंतरही अद्याप संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) स्थानिक ग्रामस्थांच्या दि. ३१ जानेवारी, २०११ च्या निवेदनानुसार चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशीमध्ये तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ६० हजार शाळा मुख्याध्यापकाविना सुरु असल्याबाबत**

**(७५) * १६३३५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) शैक्षणिक नियमानुसार ज्या शाळेत किमान १५० विद्यार्थी आहेत त्या शाळांना मुख्याध्यापक अनिवार्य असताना, डिस्ट्रीक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन (डी.आय.एस.ई.) ने माहे एप्रिल २०१५ च्या सुमारास सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रसिध्द केलेल्या अहवालात राज्यातील ७८ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या ६० हजार शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याचे नमुद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास , राज्यातील १६३ शाळामध्ये एकही शिक्षक नाही तर ३१२१ शाळा एक शिक्षकी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या प्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार मुख्याध्यापक नसलेल्या शाळांवर

मुख्याध्यापकांच्या नियुक्ती व शिक्षक नसलेल्या शाळांत शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास,त्यानुसार अद्यापपर्यंत किती शाळांवर मुख्याध्यापक व शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, किती कालावधीत करणे अपेक्षित आहे?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) यु डायस (UDISE) डेटा २०१४-१५ नुसार एक शिक्षक कार्यरत असलेल्या २७३१ शाळा आहेत.

(३), (४) व (५) बालकांचा मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १९, २५ व शेड्यूल नुसार प्राथमिक शाळांमध्ये १५० पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास १ मुख्याध्यापक मंजूर करण्यात येतात. त्यानुषंगाने इयत्ता १ ली ते ७ वी किंवा इयत्ता ८ वी ची पटसंख्या १५० पेक्षा जास्त झाल्यास १ मुख्याध्यापकाचे पद मंजूर करण्यात येते. त्यानुषंगाने १५० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना कायद्यानुसार मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(७६) * १६८३० ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर शासनाने बंदी घालूनही पिशव्यांचे उत्पादन सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहरासह विदर्भातील इतर शहरात विक्रेत्यांकडून व मुंबईत प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर केला जात असल्याचे माहे मे,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने आतापर्यंत अनधिकृतपणे प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन करणा-या कंपन्या तसेच प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या किती विक्रेत्यांवर

शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) विदर्भातील अमरावती, अकोला, नागपूर या शहरात प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा वापर केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांकडून आर्थिक दंड वसुल करण्याची कार्यवाही संबंधित महानगरपालिका यांचेकडून करण्यात आली आहे.

मुंबईत माहे एप्रिल, २०१५ मध्ये मुलुंड येथे ५२३.५०० कि.ग्रॅ. इतका साठा जप्त करण्यात आल्याचे मुंबई महानगरपालिकेच्या अहवालात नमुद केले आहे.

(३) प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन व वापराविरुध्द कठोर कारवाई करण्यांकरीता मा.मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये संपन्न झालेल्या आढावा बैठकीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या क्षत्रिय स्तरावरील सर्व प्रादेशिक अधिकाऱ्यांना, संबंधित शासकीय यंत्रणेचे क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी (उदा. महानगरपालिका, महसूल विभाग, पोलीस विभाग) घेऊन तपासणी पथके तयार करुन सर्वेक्षण करणेबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राज्यामध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये सद्य:स्थितीत एकूण २७१ कारखान्यांची तपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीअंती ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन करत असल्याचे आढळलेल्या एकूण ३० उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून पर्यावरण कायदा १९८६ (कलम १५ अंतर्गत) एकूण ०४ उद्योगांवर न्यायालयामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच वैध संमतीपत्राशिवाय उत्पादन करत असलेल्या एकूण ५६ उद्योगांवर प्रस्तावित निर्देश / कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कारवाई करण्यात आली आहे. उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेल्या ३० उद्योगांपैकी ८ कारखान्यांना बँक हमी घेऊन उत्पादन सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या विक्रेत्यांचे सर्वेक्षण करण्याकरीता महानगरपालिकांकडून फिरते पथक गठीत करण्यात आले असून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत सर्व महानगरपालिकांकडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यात जलस्त्रोत आटत असल्याने निर्माण झालेली पाणी टंचाई

**(७७) * १८१३६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे जलस्त्रोत आटत असल्याने माहे मार्च, २०१५ मध्ये अनेक गावात पाणी टंचाई जाणवत असून १६७ गावात पाणी विकत घेण्याची वेळ आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर गावांना पाणी टंचाई निवारणार्थ १ कोटी १८ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला असताना, नागरीकांना पाण्याकरिता वणवण करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी टंचाई असलेल्या गावातील नागरीकांना पाणी उपलब्ध व्हावे याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही, हे खरे नाही.

वर्धा जिल्हयात अशी परिस्थिती उभवलेली नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

सन २०१४-१५ च्या टंचाई कालावधीत टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या उपाययोजनांवर रु. ९६.८८ लक्ष खर्च करण्यात आला आहे.

(३) पाणी टंचाई कृती आराखडयास प्रस्तावित केल्याप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यातील दगडी खाणीमध्ये काम करणा-या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित असल्याबाबत**

**(७८) * १७२४४ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दगडखाण कामगारांच्या मुलांसाठी पाषाण शाळांना विशेष मुलांच्या शाळेचा दर्जा मिळण्यासाठीचा शासकीय अहवाल ८ महिने शासनाकडे प्रलंबित असल्याने तब्बल ४५ हजारांहून अधिक दगडखाण कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अद्यापपर्यंत सुटलेला नसल्याने मुलांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील २७ हजार दगडी खाणीमध्ये काम करणा-या ८५ लाख दगड खाण कामगारांची मुले शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित असल्याचे दिनांक ६ मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, राज्यातील दगड खाण कामगारांसाठी खाण कामगार विकास महामंडळ स्थापन करावे अशी मागणी संतुलन संस्थेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली व त्यानुसार उक्त कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार विद्यार्थ्यांसाठी पर्यायी शिक्षणाची व्यवस्था न करता त्यांचे इयत्ता पहिली ते आठवीचे शिक्षण नियमित शाळेत होणे आवश्यक आहे. यानुसार दगडखाण कामगारांच्या मुलांना नजिकच्या नियमित शाळेत दाखल करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) दगडखाण कामगारांसाठी खाण कामगार विकास महामंडळ स्थापन करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले असून याबाबत कामगार विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे.औरंगाबाद, पुणे आणि नागपूरच्या मेडिकल मधील बीएस्सी नर्सिंग कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आल्याबाबत

**(७९) * १६६५२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बीएससी नर्सिंगचे प्रशिक्षण देणारी नागपूर, औरंगाबाद, पुणे आणि मुंबई अशी चार शासकीय परिचर्या महाविद्यालये असून या महाविद्यालयात दरवर्षी प्रत्येकी ५० विद्यार्थी प्रवेश घेतात. मेडीकल कॉलेजमधील एमसीआयच्या धर्तीवर भारतीय परिचर्या परिषद या महाविद्यालयाचे निरिक्षण करीत असल्यामुळे यंदा माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये परिचर्या परिषदेने केलेल्या निरिक्षणात अपु-या मनुष्यबळासह अनेक त्रुटी नोंदविल्यामुळे आरोग्य विद्यापीठ, नाशिक यांनी या चारही जिल्हयातील महाविद्यालयांना पत्र पाठवून विद्यार्थी प्रवेशप्रक्रिया राबवू नका असे आदेश देऊन उक्त जिल्हयातील शासकीय परिचर्या महाविद्यालयामधील बीएस्सी नर्सिंग कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना यंदापासून परिचर्या अभ्यासक्रमापासून वंचित राहावे लागणार असल्याचे दिनांक २ जून, २०१५ वा त्या सुमारास निर्देशनास आले , हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त महाविद्यालयामध्ये प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिष्ठातांच्या पदांना राज्य शासनाने दिनांक १४ एप्रिल, २०१४ च्या सुमारास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सुध्दा अद्यापही पदभरती करण्यात न आल्याने सदरील कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग एक व दोन बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील महाविद्यालयात पदभरती करण्यासह उक्त महाविद्यालये सुरु राहण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर दि. ३/६/२०१५ रोजी मान्यता प्राप्त बी.एस्सी. (नर्सिंग) कॉलेजची यादी प्रसिध्द केली असून त्यात औरंगाबाद, नागपूर व मुंबई या परिचर्या महाविद्यालयाचा समावेश असून ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे या महाविद्यालयाचा समावेश नाही.

तथापि, पुणे येथील परिचर्या महाविद्यालयाने सन २०१२-१३ ते सन २०१५-१६ पर्यंतची रुपये ४०, ०००/- इतकी संलग्नीकरण शुल्क न भरल्यामुळे सदर महाविद्यालयाचा उक्त संकेत स्थळावर नाव दिसून येत नाही.

चौकशीअंती संबंधित परिचर्या महाविद्यालयाशी संपर्क साधून चौकशी केली असता, आज रोजी प्राचार्य, नर्सिंग महाविद्यालय व अधिष्ठाता, ससून पुणे यांनी विषयांकीत संलग्नीकरणापोटीचे यथायोग्य शुल्क भारतीय परिचर्या परिषद यांच्याकडे दि.२/७/२०१५ रोजी भरणा करुन भा.प.प. नवी दिल्लीच्या संकेत स्थळावर पुणे येथील परिचर्या महाविद्यालयाच्या नावाचा समावेश करण्याबाबत विनंती केलेली आहे.

(२) नाही.

शासन निर्णय, दि. २१/४/२०१४ च्या अन्वये शैक्षणिक (४१) व अशैक्षणिक(३) अशी एकूण ४४ पदे नव्याने निर्माण करुन भरण्यास शासनाने परवानगी दिली आहे. तथापि, सदर पदे ही आयोगाकडून न भरता सध्या कार्यरत असलेल्या पाठ्यनिर्देशकांच्या जेष्ठतम् यादीतील शैक्षणिक अर्हता पूर्ण करणा-या पाठ्यनिर्देशकांमधून भरण्यास परवानगी मिळणे बाबतचा यथायोग्य प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एपीएल रेशन कार्डधारकांना धान्य मिळण्याबाबत

**(८०) * १७१६८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.शशिकांत खेडेकर**

**(सिंदखेड राजा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ कोटी ७७ लाख कुटुंबाचा समावेश राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत होवू शकला नसल्याने त्यांना सदर योजनेत सामावून घेण्याबाबत शासन पुनर्विचार करत असल्याचे मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांनी माहे मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आश्वासन दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होत नसल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे आणि शहरी व ग्रामीण भागातील सर्व असंघटीत, कष्टकरी मजूर कामगारांना उक्त योजनेचा लाभ मिळणे गरजेचे असतानाही गोरगरीब कामगार/जनतेला या योजनेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,गत दोन वर्षापासून प्रतिज्ञा पत्रासह विभक्त कार्डाची कार्डधारकांकडून मागणी होत असून सदर मागणीकडे शासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे व विभक्त रेशन कार्डाकरिता लागू असलेल्या जाचक अटीमुळे रेशन कार्डावर साखर, पामतेल घोषित कोट्याप्रमाणे रॉकेल मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, औरंगाबाद,मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळत नाही व माथेरान (जि.रायगड) येथे माहे जानेवारी, २०१५ पासून स्वस्त धान्य मिळत नसल्याने महिलांनी दिनांक १८ फेब्रुवारी,२०१५ रोजी वा त्यासुमारास माथेरानच्या अधिक्षक कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करून अधिक्षकांना निवेदन दिले तसेच इचलकरंजी व कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारकांना माहे ऑक्टोबर, २०१४ रोजीपासून स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळत नसल्याने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रेशन बचाव कृती समितीने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल. (केशरी) मधील १.७७ कोटी लाभार्थ्यांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात ऑक्टोबर २०१४ पर्यत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले होते. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) गरजू व पात्र लाभार्थ्यांना नियमाप्रमाणे रेशनकार्ड देण्यासंदर्भात स्वयंस्पष्ट दिशानिदेश क्षेत्रीय यंत्रणेला देण्यात आले आहेत. विभक्त शिधापत्रिका हा शिधापत्रिकेचा प्रकार नसून प्रत्येक अर्जदारास त्याच्या उत्पन्नानुसार शुभ्र, केशरी व पिवळी अशा तीन प्रकारच्या शिधापत्रिकांपैकी एक शिधापत्रिका दिली जाते.

पात्र लाभार्थ्यांना विहित प्रमाणात व विहित दराने साखर व केरोसिन देण्यात येत आहे.

सध्या लक्ष्य निर्धारित सावर्जनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पामतेल वितरीत करण्यात येत नाही.

(४) व (५) औरंगाबाद, मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे स्वस्त धान्य दुकानातून नियमितरित्या धान्यपुरवठा करण्यात येत आहे. माथेरान (जि. रायगड) येथील सदर निवेदनातील मागणीनुसार गॅस पुरवठा माथेरान येथील बाजारपेठेपर्यत करण्यात येत असून तेथून ग्राहक आपआपल्या घरी सिलेंडर घेवून जात आहेत. रेशन बचाव कृती समिती, कोल्हापूर यांचे निवेदन प्राप्त झाले असून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल. (केशरी) लाभार्थ्यांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.

-----------------

**गोरेगाव (ता.माणगाव, जि.रायगड) येथील पाण्याच्या टाकीच्या दुरुस्तीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(८१) * २१३३४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गोरेगाव (ता.माणगाव, जि.रायगड) येथील पाणी समस्येवर मात करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या अडीच कोटी रुपयांच्या नविन पाणीपुरवठा योजनेतून बेअरर चेकने अदा करण्यात आलेल्या २५ लाख रुपयांच्या खर्चाचा मेळ बसविण्यासाठी जुन्या टाकीच्या दुरुस्तीला १२ लाख रुपये खर्च करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन टाकीच्या बांधकामापेक्षा जुन्या टाकीच्या दुरुस्तीसाठी जास्त प्रमाणात खर्च करण्यात येऊन देखील गळती लागल्याने दुरुस्तीच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही. मात्र प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून गोरेगाव ता.माणगांव, जि.रायगड येथील पाण्याच्या टाकीच्या दुरुस्तीमध्ये गैरव्यवहार आढळून आला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पाणी टंचाई निवारणाबाबत

**(८२) * १६४३३ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात ६३३ गावांमध्ये पाणी टंचाईची समस्या उद्भवल्याने ९० टँकर कार्यरत करण्यात आले आहे परंतू तरीही पाणी समस्याचे निराकरण करण्यात प्रशासन अपयशी ठरले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पोलादपूर (जि.रायगड) येथील ग्रामस्थ व महिलांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत असल्याचे व धोदाणी (ता.पनवेल) परिसरातील ठाकूरवाड्यांना पाणी टंचाई होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील तालुका प्रशासनाने केलेल्या यंदाच्या पाणीटंचाई निवारण आराखड्यामध्ये पावसापूर्वी २७ गावे आणि ६३ वाडयांना टँकरने पाणीपुरवठ्याची गरज असताना सध्या तीन टँकरद्वारे तालुक्यातील ४३ वाडयांना पाणीपुरवठा करण्यात येत आहेत परंतु सदर पाणी पुरवठा अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जिल्हयाला पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) सन २०१४-१५ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयामध्ये पोलादपूर तालुक्यातील २८ गावे व ६४ वाडया टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे प्रस्तावित होते. त्यापैकी प्रत्यक्षात ग्रामपंचायतीचे मागणीनुसार ४ गावे व ४९ वाडयांना ४ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

तसेच,पनवेल तालुक्यातील धोदाणी परिसरातील ठाकूरवाडयांचा समावेश सन २०१४-१५ च्या संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडयामध्ये करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे संभाव्य पाणी टंचाई कार्यक्रमाअंतर्गत उपाययोजना राबविण्यात आलेली नाही.

(४) रायगड जिल्हयातील सन २०१४-१५ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयामध्ये संभाव्य पाणी टंचाईग्रस्त ५८१ गावे व ९९५ वाडया एकूण १५७६ गावे/वाडयांचा समावेश होता. त्याचप्रमाणे सन २०१५ च्या उन्हाळयात टँकरने पाणीपुरवठा करणे व नवीन विंधन विहीरी घेणे या दोन उपाययोजना राबवून पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## विदर्भातील १४ हजारांवर प्राध्यापकांना दोन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत

**(८३) * १७२८६ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील १४ हजारांवर प्राध्यापकांना दोन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोषागारातील तांत्रिक व्यवस्थेतील दोषामुळे वेतन न मिळाल्याने वेतनाअभावी बँकाचे हप्ते चुकल्याने विदर्भातील नागपूर आणि

अमरावती विभागातील शासकीय व अनुदानीत महाविद्यालयातील सुमारे १४ हजार प्राध्यापकांना आर्थिक परिस्थितीस सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित प्राध्यापकांचे वेतन पूर्ववत करण्यासह त्यांचे शिल्लक असलेले दोन महिन्यांचे वेतन त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) तांत्रिक अडचणीमुळे मार्च, २०१५ चे वेतन अदा करण्यास १ महिन्याचा विलंब झाला आहे.
(३) संबंधित प्राध्यापकांचे वेतन अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात रेशनच्या धान्य वितरणातील काळाबाजार रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याबाबत**

**(८४) * १६५४९ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, ठाणे, रायगड आणि नवी मुंबई येथील कोटयवधी रूपयांचा रेशनिंगचा गहू, तांदूळ, शालेय पोषण आहाराचा तांदूळ थेट शासकीय गोदामातून

विनापरवानगीने  रेशनिंग माफियांद्वारे काळ्याबाजारात विकला जात असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकारात सोळा रेशन माफियांची टीम कार्यरत असून, शासकीय अधिकारी म्हणजे डीसीएस, सब वाहतुकदार आणि गोदाम प्रमुखांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मौजे नेर (जि.यवतमाळ) येथे तालुका पुरवठा विभागाचे नियंत्रण स्वस्त धान्य दुकान परवानाधारकांवर नसल्याने  दुकानांतील रॉकेल व धान्याचा काळाबाजार होत आहे तसेच मरीन लाईन्स (मुंबई) येथील एजन्सीकडून घरगुती वापराचे ३७३ गॅस सिलेंडर व व्यावसायिक वापराचे ४५० गॅस सिलेंडर व तांदूळ, गहू जप्त करण्यात आले आहे व घरगुती वापराचे गॅस सिलेंडर आणि रेशन दुकानातील धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांविरुध्द शिधावाटप विभागाने माहे मे , २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई शहर व राज्यात विशेष मोहिम व धाडसत्र सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात रेशनच्या धान्य वितरणातील काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने कायद्यात दुरुस्ती करून अजामीनपात्र गुन्हा दाखल करून ६ महिने कारावास आणि दंडाची तरतूद केली जाणार असे  माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान जाहिर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने रेशन दुकानांवरून धान्य वितरणातील काळाबाजार रोखण्याकरिता दक्षता समित्यांवरील नेमणूका करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६)  नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही,

तथापि, माहे जानेवारी ते जून, २०१५ या कालावधीत मुंबई, ठाणे शिधावाटप क्षेत्र या कार्यालयाच्या अखत्यारीतील ३ संस्थांनी केलेल्या अनियमिततेबाबत त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करुन या ३ संस्था रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच आणखी ४ संस्थांनी अनियमितता व गैरप्रकार केल्याचे आढळून आल्याने त्यांचेविरुध्द स्थानिक पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करुन त्या संस्थांचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच अन्य ५ संस्थांनी अन्नधान्य रास्तभाव दुकानास वितरीत न करता अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांचेविरुध्द स्थानिक पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करुन त्यांचे नियतन स्थगित करण्यात आले आहे.

त्याचबरोबर जय आनंद फुड इंडस्ट्रीज पडघा ता. भिवंडी येथे अनधिकृत गहू व आटा आढळून आल्याने त्यांचेविरुध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नेर ता. यवतमाळ येथे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्याचा व केरोसीनचा काळाबाजार झाल्याचे आढळून आले नाही.

दिनांक ६.५.२०१५ रोजी मे. काकड गॅस सर्व्हिसेस यांचा टेम्पो अनुदानित गॅस सिलेंडर व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा भरणा करुन तो व्यावसायिक लोकांना अनधिकृतपणे विना पावतीचे गॅस सिलेंडर वितरीत करीत असल्याचे मिळाल्याच्या माहितीच्या आधारे फिरत्या पथकाने पंचासह छापा टाकला असता मे.काकड गॅस एजन्सी यांचा डिलीव्हरी बॉय व त्याचा साथीदार यांना पकडले. यानुषंगाने मे.काकड गॅस सर्व्हीस यांची तपासणी केली असता तपासणीमध्ये ऑन लाईन साठा विवरणपत्र व प्रत्यक्ष साठ्यातील सिलेंडरचा फरक विचारात घेता ३६३ घरगुती गॅस सिलेंडर व ४५० व्यावसायिक गॅस सिलेंडर असा फरक आढळला. त्यामुळे मे.काकड गॅस सर्व्हीसेस यांनी जीवनावश्यक वस्तु कायदा व दि. लिक्वीफाईड पेट्रोलियम गॅस आर्डर २००० मधील तरतुदीचा भंग केल्याने या दोन व्यक्तीविरुध्द लोकमान्य टिळक मार्ग पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र.१८/२०१५ दि.६.५.२०१५ अन्वये नोंद केली असून त्यामध्ये रु. २२,२८,६२०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत अन्नधान्य जप्त करण्यात आले नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गैरप्रकार होऊ नयेत याकरीता नियमित व आकस्मिक तपासण्या करण्यात येतात.

(४) जीवनावश्यक वस्तुंच्या काळ्याबाजारास आळा बसावा व काळाबाजार करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, या दृष्टीकोनातून काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींचा समावेश एम.पी.डी.ए. (The Maharashtra prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggars and Drug Offenders, Dangerous Persons and Video Pirates) Act १९८१ या अधिनियमामध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत मंजुर करण्यात आला आहे.

(५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत जनतेचा सहभाग राहण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तुंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी राज्य शासनाच्या दि. २३.१.२००८ च्या शासन निर्णयानुसार ग्राम, तालुका, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हास्तरावर दक्षता समित्या गठीत केल्या आहेत. या सर्व समित्या स्थायी स्वरुपातील आहेत. या

समित्यांवर शासकीय व अशासकीय सदस्य असतात. सदर अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून त्यांच्या नियुक्तींची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोर्डाच्या परिक्षा कालावधीत वापरण्यात आलेल्या**
**जनरेटरचे भाडे अदा करण्याबाबत**

**(८५) * १६३३६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण मंडळाच्या एसएससी आणि एचएससी बोर्डाच्या परिक्षेदरम्यान लोडशेडिंगच्या भागात परीक्षा मंडळाच्या सर्व केंद्र प्रमुखांनी परीक्षेच्या कालावधीत जनरेटर घेऊन पर्यायी व्यवस्था करावी असे आदेश शासनाने दिले होते त्यानुषंगाने सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात माहे मार्च-एप्रिल, २०१५ च्या सुमारास दहावी व बारावीच्या परिक्षेच्या अंतिम वेळी लावण्यात आलेल्या जनरेटरचे भाडे देण्यास परिक्षा मंडळ व शिक्षणाधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याने जनरेटरच्या मालकांना अद्यापही भाडे मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील एकूण शाळांपैकी ७६ टक्के शाळांमध्ये वीज जोडणी असून २४ टक्के शाळांना अद्यापही वीजपुरवठा करण्यात आलेला नसल्याचे तसेच शाळामधील सोयी सुविधांच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्र.१८ वर गेला असल्याचे, नॅशनल युनिर्व्हसिटी ऑफ एज्युकेशन प्लॅनींग ॲण्ड ॲडमिनीस्ट्रेशनने माहे जुलै, २०१३ च्या सुमारास केलेल्या जिल्हा माहिती पाहणी अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार प्रश्न भाग एक बाबत जनरेटरचे भाडे संबंधितांना त्वरीत देण्याबाबत तसेच उपरोक्त प्रश्न भाग (२) बाबत

शाळांना विद्युत पुरवठा व इतर सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) राज्यातील एच.एस.सी. व एस.एस.सी. बोर्डाच्या मार्च/एप्रिल, २०१५ च्या परीक्षेच्या वेळी पुरवठा करण्यात आलेल्या जनरेटरचे भाडे संबंधितांना अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शाळांना विद्युत पुरवठ्याच्या बाबतीत शासनाकडून देण्यात येणाऱ्या वेतनेतर अनुदानातून वीजेचा आकार खर्च करण्याची तरतुद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावली (जि.चंद्रपुर) तालुक्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांबाबत

**(८६) * १६६५३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अंतरगाव, निफद्रा, निमगाव, पारडी, कवठी, रुदापूर, सावली या गावामध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत असल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना सन २०१५-१६ मध्ये सावली येथे ८० लाख रुपये खर्चाची वाढीव पाणी पुरवठा योजना, पारडी-कवठी-रुदापूर हे तिन्ही गावे मिळून १२० लक्ष रुपये खर्चाची संयुक्त जलशुध्दीकरण केंद्रासह पाणी पुरवठा योजना, अंतरगाव-निफंद्रा-निमगांव हे तिन्ही गावे मिळून १६० लक्ष रुपये खर्चाची संयुक्त जलशुध्दीकरण केंद्रासह पाणी पुरवठा योजना, डोंगरगाव मस्के या गावामध्ये ४५ लक्ष रुपये खर्चाची जलशुध्दीकरण केंद्रासह पाणी पुरवठा योजना, बेलगाव या गावामध्ये ४० लक्ष रुपये खर्चाची जलशुध्दीकरण केंद्रासह पाणी पुरवठा योजनेचे प्रस्ताव जिल्हापरिषद ग्रामीण पुरवठा विभाग, चंद्रपूर, या विभागाने तयार केले असल्याची माहिती दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाचही पाणी पुरवठा योजनेला निधीसह मंजूरी देण्यात यावी असे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हापरिषद, चंद्रपूर कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाचही पाणी पुरवठा योजना निधीसह मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर गावांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१५-१६ च्या कृती आराखड्यात समावेश असून, या पाचही पाणी पुरवठा योजनांबाबत भूजल सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पडघा (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील जय आनंद फुड इंडस्ट्रिजमध्ये स्वस्त धान्यापासून बेकायदेशीरपणे रवा व मैदा तयार करुन खुल्या बाजारात विक्री होत असल्याबाबत**

**(८७) * १६४३४ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पडघाजवळील (ता.भिवंडी, जि.ठाणे) भादाणे गावच्या हद्दीत असलेल्या जय आनंद फुड इंडस्ट्रीज नावाच्या फ्लोअर मिलमध्ये गोरगरीबांसाठी स्वस्त धान्य दुकानातून पुरवठा करण्यात येणारे गहू फ्लोअर मिलमध्ये आणून त्यापासून पीठ,

रवा, मैदा तयार करून तो खुल्या बाजारात बेकायदेशीर पध्दतीने विक्री केला जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले असता अन्न पुरवठा अधिकारी पथकाने पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग आणि वसई, काशिमीरा, बोरीवली या परिसरातून काळ्या बाजारात विकण्यासाठी आणलेला रेशनिंगच्या धान्याच्या ६०० गोण्या गहू तर फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एफसीआय) २ हजार गोण्यातील गव्हाचा साठा पडघा येथे जिल्हाधिकारी ठाणे यांनी दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास जप्त केला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबई परिसरातील रेशनिंगवर गरिबांसाठी पुरविण्यात येणारा गहू पुरवठा अधिकाऱ्यांना हाताशी धरुन काळ्या बाजारात विकण्याचा प्रकार सुरु होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने रेशनिंग माफिया टोळी विरोधात तसेच संबंधित दोषीं अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांनी मौ. भादाणे, ता. भिवंडी येथील जय आनंद फुड इंडस्ट्रीजवर दि.०२ मे, २०१५ रोजी टाकलेल्या धाडीत प्रती ५० किलो वजनाच्या गव्हाच्या२४१३ गोणी व ४०,००० किलो सुटा गहू जप्त करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी संबंधीतांविरुध्द जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ कलम ३ व ७ प्रमाणे पडघा पोलिस स्टेशनमध्ये गु.रजि. क्र. II ०६/२०१५, दि.०३ मे, २०१५ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.
(२) मौ.भादाने, ता. भिवंडी येथील जय आनंद फुड इंडस्ट्रीजमध्ये जप्त केलेले धान्य निश्चित कोठून आलेले आहे. याबाबत तपास सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रस्तावित महाविद्यालयांना मान्यता मिळण्याबाबत**

**(८८) * १७२९३ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड) , श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव**

**(गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहा विद्यापीठांतील तब्बल १६८ महाविद्यालयांचे, ३६ विद्या शाखा, २६८ विषय अभ्यासक्रम आणि ३०४ तुकड्यांचे प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परत पाठविले असुन दिनांक २९ एप्रिल, २०१५ च्या निर्णयानुसार कृषी विद्यापीठांव्यतिरिक्त सन २०१५-१६ या नव्या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील कोणत्याही महाविद्यालयांना वा अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्यात येणार नसल्याचा निर्णय शासनाने घेतला असून यासंदर्भातील परिपत्रक दि. ३० एप्रिल, २०१५ रोजी जारी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून अभियांत्रीकी, पॉलीटेक्नीक, फार्मसी तसेच व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना पायाभूत सोयी-सुविधा नसणे, अध्यापकांची रिक्त पदे तसेच शैक्षणिक कामगिरी सुमार असल्यामुळे राज्यातील जवळपास ८८ महाविद्यालयातील अभ्यासक्रमाची मान्यता रद्द करावी अशी नोटीस दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निर्णय घेण्याची कारणे काय आहेत, या प्रस्तावित नवीन महाविद्यालयांना मान्यता मिळावी व सदरहू शासन निर्णय रद्द करावा यासाठी प्राचार्य व संस्थाचालक यांच्याकडून शासनाकडे दाद मागण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) (i) राज्यातील महाविद्‌यालयात सुमारे २५ टक्के प्रवेशाच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आल्यावरुन विद्‌यापीठ अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्‌यापीठातील बृहत आराखड्याच्या प्रक्रीयेत सुधारणा करणे. या वर्षी नवीन महाविद्‌यालयाची मान्यता न देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर सुधारीत बृहत आराखडे शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(ii) सदर संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी मुदत वाढ न दिल्यामुळे आणि प्रवेश क्षमतेत घट केल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार सन २०१५-१६ मध्ये अभियांत्रिकी व पदव्युत्तर आणि पदविका संस्थाना प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यात कार्डियाक स्टेण्ट या वैद्‌यकीय उपकरणाचा औषध मूल्य नियंत्रण सूचित अत्यावश्यक औषधामध्ये समावेश करण्याबाबत

**(८९) * १६५५३ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सूधाकर कोहळे (नागपूर-दक्षिण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला),**

**श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व औषध प्रशासनाने हृदयविकार रुग्णांसाठी अत्यंत महत्वाच्या कार्डियाक स्टेण्ट या वैद्यकीय उपकरणाचा औषध मूल्य नियंत्रण सूचित अत्यावश्यक औषधामध्ये समावेश करण्याची शिफारस राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरणाकडे (एफडीए) केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई, पुणे आणि नाशिक या भागातील स्टेण्ट वितरक कंपन्या आणि रुग्णालयामध्ये एफडीएने टाकलेल्या धाडीमध्ये सदर स्टेण्ट जास्त दराने विकल्या जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्डियाक स्टेण्ट हे उपकरण आयात होत असून ते ग्राहकांच्या हाती पडेपर्यंत त्याच्या किंमतीत ३०० ते ७०० टक्के वाढ होते पर्यायाने गरजू रुग्णांना ते अत्यंत चढ्या दराने विकत घ्यावे लागते राज्यातील गरजू रुग्णांची ही फसवणूक थांबविण्यासाठी या उपकरणाची किंमत निश्चित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरणाकडे एफडीएकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करुन सदर उपकरणाची किंमत कमी करण्याबाबत तसेच प्रश्न भाग (२) मधील दोषी रुग्णालय तसेच कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

पत्र क्र.आयबी २७७/१५/८, दि. १८/५/२०१५ अन्वये राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरणाकडे याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने धाडी टाकल्या नव्हत्या. परंतु याबाबत चौकशी करण्यात आली होती.

(३) सध्या कार्डियाक स्टेंट्स ची किंमत औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत नियंत्रित होत नसल्याने उत्पादक स्वत: किंमत ठरवु शकतो तथापि, छापील एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने विक्रि करण्यास निर्बंध आहे.

अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या चोकशीमध्ये स्टेंट एम.आर.पी. पेक्षा जास्त किमतीने विकल्याचे आढळले नाही. त्यामुळे कारवाई करण्यात आली नाही.

स्टेंटच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता प्रशासनाने राष्ट्रीय औषध निर्माण मूल्य प्राधिकरणास पत्र क्र. आयबी/२७७/१५/८, दि. १८.०५.२०१५ अन्वये कार्डियाक स्टेंटच्या किमती नियंत्रणाखाली आणण्याबाबत तसेच Profit Margin ठरविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.